महाराष्ट्र विधानपरिषद

दुसरे अधिवेशन, २०२०

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

बुधवार, दिनांक ०४ मार्च, २०२० / फाल्गुन १४, १९४१ (शके)

(१) मुख्यमंत्री
(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री
(३) गृहनिर्माण मंत्री
(४) नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ८०

मे.ओमकार रिअलटर्स व डेव्हलपर्स प्रा.लि. विकासकाने गैरव्यवहार केल्याबाबत

(१) * १५८ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे.ओमकार रिअलटर्स व डेव्हलपर्स प्रा.लि. विकासकाने झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतील अधिकाऱ्यांशी संगनमत करुन विविध बाबींकरीता आरक्षित असलेल्या भुखंडाच्या आरक्षणात अनधिकृतरित्या बदल करुन अटी व नियमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी विविध संसदीय आयुधांमार्फत दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ पासून ते आजतागायत प्रश्न उपस्थित करुनही सदर विकासकाविरुध्द कारवाई करण्यास दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंड हा प्रस्तावित उद्यान, शाळा, बालवाड्या, कल्याण केंद्र, सोसायटी कार्यालय, हॉस्पिटल, स्मशानभूमी इ. करीता आरक्षित असून उक्त आरक्षणास १६ वर्षे उलटूनही विद्यार्थ्यांसाठी शाळा बांधण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माजी गृहनिर्माण राज्यमंत्री व अधिकारी यांनी प्रत्यक्ष बांधकामाच्या ठिकाणी दौरा (व्हीजीट) करुन तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी बैठका, पत्रव्यवहार इत्यादी माध्यमातून पाठपुरावा करुनही कार्यवाहीस विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जितेंद्र आव्हाड : (१) हे खरे नाही.

(२) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या भूखंडावरील आरक्षणांपैकी प्राथमिक शाळेसाठी १५७९ चौ.मी. आरक्षित असून त्यापैकी एकूण १०५९.८८ चौ.मी. क्षेत्रफळाची शाळा बांधून जवळ जवळ पूर्ण झाली आहे. विकासकाला भोगवटा प्रमाणपत्र दिल्यावर सदर आरक्षण विकासकाव्दारे महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात येते. सद्य:स्थितीत सदर योजना प्रगतीपथावर असून सदर योजनेतील मंजूर विक्री घटकाच्या २५% बांधकाम क्षेत्राकरीता भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित करण्यापूर्वी सदर योजनेतील मोकळ्या जागेची आरक्षणे व बांधकाम करावयाची आरक्षणे विकसित करुन संबंधित सक्षम प्राधिकरणास हस्तांतरीत करणे विकासकावर बंधनकारक आहे. तसेच सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील विविध आरक्षणे नियमानुसार हस्तांतरीत करण्याबाबत दिनांक १९/०१/२०१० च्या आशयपत्रात अटी नमूद करण्यात आल्या आहेत.

(३) तत्कालीन मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी दिनांक २०/०४/२०१८ रोजी स्थळपाहणी केल्यानंतर त्यांच्याकडे दिनांक १५/०२/२०१९ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीत तत्कालीन मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी दिलेल्या निर्देशानुसार झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने विकासकास नोटीस बजावून विकासकाकडून खुलासा प्राप्त करुन घेतलेला आहे. तत्कालीन मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांच्या निर्देशानुसार झोपडपट्टी

पुनर्वसन प्राधिकरणाने विकासकावर कारवाई करण्यात हयगय केलेली नसून विकासकाने केलेला खुलासा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने ग्राह्य धरलेला आहे, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विकासकाकडून घेतलेल्या खुलाशानुसार सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे काम ग्राह्य धरण्याइतपत झाले आहे. तसेच तत्कालीन मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांच्या निर्देशानुसार विकासकावर कारवाई करण्यात आली आहे असा, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

भिडेवाडा शाळा (जि.पुणे) राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्याबाबत

(२) * ७३८ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती स्मिता वाघ, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिडेवाडा (जि.पुणे) येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुरु केलेली देशातील पहिल्या मुलींच्या शाळेची वास्तू मोडकळीस आल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वास्तूस दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी १७२ वर्षे पूर्ण झाली असल्याने उक्त वास्तू ऐतिहासिक वास्तू म्हणून घोषित करून त्याठिकाणी राष्ट्रीय स्मारक उभारण्याची मागणी अनेक सामाजिक संस्थांमार्फत करण्यात आली असूनही भिडेवाडा शाळा ही राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित होण्यापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेने सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात भिडेवाड्याच्या दुरुस्तीसाठी एक कोटी रुपयाची तरतूद करूनही दुरुस्तीचे काम करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ऐतिहासिक वास्तूचे जतन करुन राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर ऐतिहासिक वास्तू पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन त्याठिकाणी राष्ट्रीय स्मारक करण्याबाबत पुणे महानगरपालिकेने मुख्य सभा ठराव दिनांक २१/०२/२००६ रोजी मान्य केला आहे.

भिडेवाडा दुरुस्तीसाठी पुणे महानगरपालिकेच्या अंदाज पत्रकात दरवर्षी तरतुद करण्यात येत असून सन २०१९-२०२० च्या अंदाज पत्रकात रुपये १,४०,००,०००/- एवढी रक्कमेची तरतुद केलेली आहे.

सदर मिळकतीच्या जागेबाबत न्यायप्रविष्ट प्रकरण सुरु असल्याने सदर जागा अद्याप पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आली नसल्याने कोणत्याही प्रकारचे दुरुस्तीचे काम अद्यापपर्यंत करण्यात आलेले नाही.

भिडेवाडा इमारतीस राष्ट्रीय स्मारक घोषित करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने हेरिटेज वास्तुंची ग्रेड यादी तयार केली असून त्यामध्ये भिडेवाड्याचा समावेश आहे.

भिडेवाड्यास राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे येथे एसआरए योजनेंतर्गत ३०० चौ. फुटांच्या सदनिकेस मंजूरी मिळण्याबाबत

(३) * ५५९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील एसआरए योजनेच्या धर्तीवर ठाणे शहरातील धोकादायक इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांना क्लस्टर योजनेंतर्गत ३०० चौ.फुटांची घरे दिली जातील असे आश्वासन ठाणे महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांना देवूनही सदर योजनेला मंजूरी देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे येथे एसआरए कार्यालय सुरू झाल्यापासून केवळ ८ ते १० प्रस्तावच प्राप्त झाले असून सद्य:स्थितीत उक्त योजनेंतर्गत २६९ चौ. फुटाचेच घर मिळत असल्याने विकासकही ह्या योजनेचे काम हाती घेण्यास उत्सुक नसल्यामुळे सदर योजना अपयशी ठरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जितेंद्र आव्हाड : (१) एसआरए योजनेंतर्गत २६९ चौ. फुटाऐवजी ३०० चौ. फुटाचे घर देण्याबाबत विभागाने निर्णय घेतला आहे.
(२) ठाणे येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे कार्यालय सुरू झाल्यापासून म्हणजेच दिनांक ०८ एप्रिल, २०१६ पासून झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे १९ प्रस्ताव नव्याने प्राप्त झाले आहेत.

सद्य:स्थितीत ठाणे झोपडपट्टी योजनेंतर्गत २६९ चौ.फुट चटई क्षेत्राच्याच घराची तरतुद असल्याचे या पुनर्वसन योजनांस विकासकांकडून आवश्यक प्रमाणात प्रतिसाद मिळत नसल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे यांनी कळविले आहे.
(३) व (४) वरील अनुक्रमांक १ नुसार निर्णय घेण्यात आला आहे.

मुंबई महापालिकेच्या शाळांमध्ये व्हर्च्युअल क्लास रूमचे कंत्राट व्हॅल्युएब एज्युटेंमेंट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला निविदा न मागविता देण्यात आल्याबाबत

(४) * **८०७ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महापालिकेच्या शाळांमध्ये सन २०११ पासून सुरु करण्यात आलेले व्हर्च्युअल क्लास रूमचे कंत्राट व्हॅल्युएब एज्युटेंमेंट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला कोणत्याही प्रकारची निविदा न मागवता देण्यात आले असून आतापर्यंत सलग आठ वेळा मुदतवाढही देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०११ ते २०१६ या पाच वर्षाच्या कालावधीकरीता व्हॅल्युएबल एज्युटेंमेंट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला एकूण १५.०६ कोटी रूपयांचे मूळ कंत्राट देण्यात आले होते. परंतु, सदर कंपनीला तब्बल आठ वेळा मुदतवाढ देवून कंत्राट वाढविण्यात आल्यामुळे १५.०६ कोटी रुपये कंत्राटाची रक्कम आता २७.९६ कोटी रुपयापर्यंत पोहचल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सन २०११ मध्ये प्रथम टप्प्यात, ८० माध्यमिक शाळांकरीता २ स्टुडिओच्या सहाय्याने व्हर्च्युअल ट्रेनिंग सेंटर प्रकल्प सुरु करण्यासाठी निविदा पध्दतीने कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली होती. सदर कंत्राटाचा कालावधी माहे जुलै, २०१६ मध्ये संपुष्टात आला.

प्रकल्पाचा प्रथम टप्पा यशस्वी होत असल्यामुळे सन २०१३ मध्ये व्दितीय टप्प्यात, ३६० प्राथमिक व ४० माध्यमिक शाळांकरीता नव्याने निविदा मागवून २ अतिरिक्त स्टुडिओ उभारण्यात आले. सदर कंत्राटाचा कालावधी माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये संपुष्टात आला.

प्रकल्प सुरळीत ठेवण्याकरीता प्रकल्पाचे परिरक्षण, प्रचालन व अद्यावतीकरण करण्यासाठी सन २०१७ व २०१८ मध्ये दोन वेळा निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्या होत्या. तसेच निविदाकारांना निविदा सादर करण्यासाठी प्रत्येक वेळी चार वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु प्रथम वेळेस एकही देकारदार प्रतिसादात्मक ठरला नसल्याने तसेच व्दितीय वेळेस पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे निविदा रद्द करण्यात आल्या होत्या.

त्यामुळे नवीन कंत्राटदाराची नियुक्ती होऊ न शकल्याने माहे ऑक्टोबर, २०१९ पर्यंत विद्यमान कंत्राटदारास महानगरपालिकेमार्फत स्थायी समितीच्या मान्यतेने प्रथम टप्प्याच्या कंत्राटासाठी ६ वेळा व व्दितीय टप्प्याच्या कंत्राटासाठी ५ वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत तिसऱ्यांदा निविदा मागविण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(२) व्हर्च्युअल ट्रेनिंग सेंटर प्रकल्पाचा सन २०११ ते २०१९ या कालावधीतील प्रथम टप्प्याच्या कंत्राटाचा खर्च रुपये २५.८४ कोटी असून सन २०१३ ते २०१९ या कालावधीत व्दितीय टप्प्याच्या कंत्राटाचा खर्च रुपये ४४.५० कोटी इतका आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद शहरातील शैक्षणिक संस्थाना मालमत्ता कर व्यावसायिक कराच्या दराप्रमाणे लावण्यात आल्याबाबत

(५) * १४६ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४६९८७ ला दिनांक १९ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालये मिळून १००० शैक्षणिक संस्था असून महानगरपालिकेने शहरातील शैक्षणिक संस्थांना मालमत्ता कर हा व्यावसायिक कराच्या दराप्रमाणे लावून वसुलीसाठी नोटीस दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक संस्था या धर्मादाय कायद्यांतर्गत नोंदणीकृत असल्याने मालमत्ता कर व्यावसायिक दराने लावु नये म्हणून संस्थांनी मागणी केली असून मुंबई मध्ये शैक्षणिक संस्थाना मालमत्ता करात माफी मिळत असून नागपूर व अमरावती येथील शैक्षणिक संस्थाना ५० टक्केच मालमत्ता कर लावण्यात येतो असे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शैक्षणिक संस्थाना मालमत्ता कर व्यावसायिक कराच्या दराप्रमाणे न लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) औरंगाबाद महानगरपालिकेने सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार शैक्षणिक संस्थांना खालीलप्रमाणे मालमत्ता कर लागू केलेले असून, त्यानुसार मालमत्ता कराची नियमित देयके शैक्षणिक संस्थांना देण्यात आली आहेत : -

- अनुदानित शैक्षणिक संस्थांना निवासी दराने म्हणजेच ३०% सामान्य कर व नियमानुसार इतर कर,
- विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांना व्यापारी मिळकतीसाठी असलेल्या ४५% ऐवजी ३७.५ % दराने सामान्य कर,
- वैदयकीय महाविद्यालयाच्या फक्त रुग्णालयासाठी वापर होणाऱ्या इमारतींना व्यावसायिक वापराच्या इमारतीसाठी असलेला ४५% सामान्य कर व नियमानुसार इतर कर.

व्यावसायिक दराने मालमत्ता कर लावून त्याच्या वसुलीसाठी कोणत्याही नोटीसा शैक्षणिक संस्थांना देण्यात आल्या नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) औरंगाबाद शहरातील काही शैक्षणिक संस्थांनी धर्मादाय कायद्यांतर्गत नोंदणीकृत असल्याने त्यांना सामान्य करामध्ये सूट देण्याबाबत महानगरपालिका प्रशासनास निवेदने दिली आहेत.

महानगरपालिका अधिनियमानुसार महानगरपालिका या स्वायत्त संस्था असल्यामुळे त्या अशा प्रकरणात निर्णय घेण्यास सक्षम आहेत.

त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात धर्मादाय कायद्याखालील नोंदणीकृत असलेल्या शैक्षणिक संस्थांना मालमत्ता करात सवलत देण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे. तसेच अमरावती व नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील अशा शैक्षणिक संस्थांना गैरनिवासी दराने कर आकारणी करण्यात येत असल्याचे संबंधित महानगरपालिकांनी कळविले आहे.

(३) औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात सर्वसाधारण सभेने केलेल्या ठरावानुसार शैक्षणिक संस्थांना अनुदानित व विनाअनुदानित असे वर्गीकरण करुन त्यांना उपरोक्त भाग-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मालमत्ता कराची आकारणी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबई, पनवेल व उरण येथील बांधकामे नियमित करण्याबाबत

(६) * १२३६ श्री.बाळाराम पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराची गर्दी कमी करण्याच्या हेतूने सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबई प्रकल्पाची उभारणी करुन शहरीकरण राबविताना गावांचे गावठाण विस्तार, गावठाण हद्द निश्चिती, सिटी सर्वेक्षण याकडे सिडकोने दुर्लक्ष केल्यामुळे गावठाणातील आणि विस्तारीत गावठाणातील बांधकामांचे सिटीसर्वेक्षण अभावी सनद (प्रॉपर्टीकार्ड) नाकारल्याने सदर बांधकामे अनधिकृत ठरवली गेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको महामंडळाने दिनांक २२ जानेवारी, २०१० रोजी प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्याच्या प्रस्तावावर ठराव क्र ९९४९, दिनांक ३ ऑक्टोंबर, २००८ अन्वये मान्यता दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नवी मुंबई, पनवेल व उरण येथे गरजेपोटी बांधलेली बांधकामे नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) अशी बाब नाही.

(२) व (३) होय.

सिडको संचालक मंडळाचा ठराव क्र.९९४९, दिनांक ०३/१०/२००८ अन्वये नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांनी रहिवासी उपयोगासाठी गरजेपोटी बांधलेली अतिक्रमित घरे नियमित करण्याच्या प्रस्तावास शासन पत्र दिनांक २२/०१/२०१० अन्वये मान्यता दिली होती. तथापि, मूळ गावठाण दाटीवाटीचे क्षेत्र व परिसराचा विस्तार करताना प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामाचे नियमितीकरण होईल या उद्देशाने गावठाण व परिसराचा विकास समूह विकास (Cluster Development) योजनेच्या माध्यमातून निर्णय घेण्यात आलेला आहे. समूह विकास योजनेची (क्लस्टर योजना) तरतूद नवी

मुंबईतील सिडको नवनगरविकास प्राधिकरणाच्या अधिसूचित क्षेत्राच्या सर्वसाधारण विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विनियम ३५ नव्याने अंतर्भूत करण्यासाठी तसेच नवी मुंबई महानगरपालिकेचे मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत विनियम ४६(६) च्या नव्याने अंतर्भाव करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१एए) अन्वये फेरबदलाची अधिसूचना दिनांक ०४/०३/२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर फेरबदलाच्या सुचनेच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या हरकती / सूचना विचारात घेवून, फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून अंतिम निर्णय शासनस्तरावर विचाराधीन आहे.

तसेच नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामाबाबत जिल्हाधिकारी, ठाणे व रायगड यांच्यामार्फत सर्वेक्षणाची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

म्हाडाच्या पुनर्विकास योजनांमध्ये सहभागी असलेल्या विकासकांकडे कोटयवधीची थकबाकी असल्याबाबत

(७) * १२०२ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार, श्री.विलास पोतनीस, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामदास कदम, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विनायकराव मेटे, श्री.जयंत पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.निलय नाईक : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून हाती घेण्यात आलेल्या विशेष मोहिमेत म्हाडाच्या पुनर्विकास योजनांमध्ये सहभागी असलेल्या ४४ विकासकांकडे सुमारे १६७ कोटींची थकबाकी असल्याची धक्कादायक बाब दिनांक ०८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाच्या "सेस" (उपकरप्राप्त) इमारत पुनर्विकास योजना राबविताना रहिवाशांना तात्पुरत्या स्वरुपात म्हाडाच्या संक्रमण शिबिरात उपलब्ध करुन देण्यात आलेली घरे पुन्हा म्हाडा मंडळास परत करणे अनिवार्य असूनही विविध कारणांनी विकासकांकडून घरे परत केली जात नसल्यामुळे ती घरे अन्य लोकांना देण्याकरीता उपयोगात आणता येत नाही, त्यामुळे म्हाडा मंडळाकडून उक्त थकबाकी संदर्भात नव्याने आढावा घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत विकासकांच्या ताब्यात असलेल्या घरांची संख्या ३३५३ इतकी असून ती घरे म्हाडा मंडळास परत करण्याबाबत तसेच विकासकांकडे असलेली सुमारे १६७ कोटीची थकबाकी विनाविलंब वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्याची, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जितेंद्र आव्हाड : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत विकास नियंत्रण नियमावली ३३(५), ३३(७), ३३(९) व ३३(१०) अंतर्गत उपकरप्राप्त इमारतीच्या/झोपडपट्टी पुनर्विकासाकरीता ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त विकासक/सहकारी संस्था यांना मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबिरात विविध अटी व शर्तीच्या अनुषंगाने संक्रमण गाळयांचे वितरण करण्यात येते.

विकासकामार्फत भाडे अदा करण्याबाबत दिरंगाई व अनियमितता दिसून आल्याने थकीत रक्कमेचा भरणा करणेबाबत तसेच थकीत रक्कमेचा भरणा न केल्यास म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ९५अ(३) नुसार सक्तीची निष्कासन कारवाई करुन संक्रमण गाळे ताब्यात घेण्यात येतील, अशा आशयाच्या नोटीस विकासकास देण्यात आल्या आहेत.

सदर नोटीसला विकासकामार्फत कुठलाही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने विकासक करीत असलेल्या पुनर्विकास प्रकल्पास काम थांबवा नोटीस (Stop Work Notice) देण्यात आल्या आहेत.

म्हाड अधिनियम १९७६ चे कलम १८० अंतर्गत कारवाई करणेस्तव विकासक यांचे बँक खात्यांचा तपशिल व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विकासक यांचे जंगम व स्थावर मालमत्तेचा तपशिल मागविण्यात आला आहे. तथापी सदर अहवाल अद्यापपर्यंत अप्राप्त असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

विकासकांकडील संक्रमण गाळ्यापोटी थकीत भाड्याच्या वसूलीकरीता मा.न्यायालयामध्ये Recovery Civil Suit दाखल करण्याबाबत संबंधित मंडळाकडून पॅनल वकील यांना कळविण्यात आले आहे.

थकबाकीदार १२ विकासकांविरुध्द खेरवाडी पोलीस ठाणे येथे मंडळाकडून तक्रार दाखल करण्यात आली आहे.

विकासकांना काम थांबवा नोटीस दिल्यानंतर माहे एप्रिल, २०१६ ते माहे मार्च, २०१९ पर्यंत रक्कम रुपये ८५.११ कोटी व चालू वर्षामध्ये माहे एप्रिल, २०१९ ते ३१ जानेवारी, २०२० दरम्यान रुपये १८.०३ कोटी रक्कम अशी एकूण रुपये १०३.१४ कोटी वसुल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई येथील अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

(८) * ५३ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ४६५१८ ला दिनांक १८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील अरबी समुद्रात उभारावयाच्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्पाची निविदा सन २०१७ मध्ये काढण्यात आली असून त्यामध्ये मे.एल ॲण्ड टी कंपनीची रूपये ३ हजार ८२६ कोटी रक्कमेच्या प्राप्त निविदेनुसार स्मारक उभारण्याच्या अन्य कामांसह ८३.२ मीटर उंचीचा पुतळा आणि ३८ मीटर लांबीची तलवार इत्यादी बाबी अंतर्भूत होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन शासनाने मे.एल ॲण्ड टी कंपनीशी वाटाघाटी करुन कंत्राटाची रक्कम रुपये २ हजार ५०० कोटीपर्यंत कमी केल्याचे दाखवून स्मारकाच्या मूळ संरचनेत बदल करुन स्मारकाची उंची, तलवारीची लांबी तसेच स्मारकाचे क्षेत्र १५.६ हेक्टरवरुन १२.८ हेक्टरपर्यंत कमी करुन गैरव्यवहार केल्याचे दिनांक २५ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी संसदेस सादर केलेल्या अहवालामध्ये "हा व्यवहार कंत्राटदार कंपनीच्या फायदयासाठी पुनर्निविदा न मागविता केला असल्याचा" लेखी आक्षेप देखील नोंदविला असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) होय, हे खरे आहे.

(२) उच्चस्तरीय सुकाणू समितीने निविदा अटी व शर्ती यांच्या मर्यादेत व स्मारकाच्या एकूण २१० मीटर उंचीमध्ये बदल न करता प्रकल्पाची किंमत कमी करण्याच्यादृष्टीने मे.एल ॲण्ड टी कंपनीसोबत वाटाघाटी करण्याच्या दिलेल्या निर्देशास अनुसरुन प्रकल्पाचे Cost Optimisation करण्यात आले. त्यानुसार उलट संपूर्ण स्मारकाची एकूण उंची २१२ मीटर अंतिम करण्यात आली असून भरावाचे किमान क्षेत्रफळ ६.८० हेक्टर ठेवण्यात आले आहे. Cost Optimisation अंती कंत्राटाची किंमत रुपये २५८१ कोटी + वस्तू व

सेवा कर अशी निश्चित करण्यात आली आहे. तथापि, महालेखाकारांनी निविदा प्रक्रियेबाबत घेतलेले गंभीर आक्षेप विचारात घेता सदर निविदा प्रक्रियेबाबत सविस्तर चौकशी करुन निर्णय घेण्यात येईल व काम जलदगतीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील.

(३) अंशत: खरे आहे.

(४) महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपांचे गांभीर्य लक्षात घेता निविदा प्रक्रियेबाबत सविस्तर चौकशी करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र शासनाच्या फास्टटॅग टोलवसुली योजनेत अनेक त्रुटी आढळून आल्याबाबत

(९) * ११११ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.विनायकराव मेटे, श्री.सदाशिव खोत, श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजीपासून लागू केलेल्या फास्टटॅग टोलवसुली यंत्रणेमध्ये बऱ्याच त्रुटी आढळून आल्या असून राज्यात वाहनधारकांनी आपल्या वाहनांसाठी फास्टटॅग टोलयंत्रणा कार्यान्वित करण्यास सुरुवात केली असता सायबर हॅकर्सनी ही यंत्रणा हॅक करून वाहनधारकांच्या खात्यातील मोठमोठ्या रकमा परस्पर वळवण्यास सुरुवात केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेमुळे वाहनधारकांमध्ये भितीचे व चिंतेचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन सदर यंत्रणेतील त्रुटी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) हे खरे नाही.

राज्य शासनाच्या कार्यक्षेत्रातील राष्ट्रीय महामार्गांवर तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारितील २ प्रकल्पांवर फास्टटॅग प्रणाली सुरु करण्यात आली आहे. तथापि, सदरहू यंत्रणा हॅक झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील नायर रुग्णालयात निवासी डॉक्टरांसह सुरक्षारक्षकावर हल्ला करण्यात आल्याबाबत

(१०) * ४७८ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नायर रुग्णालयात निवासी डॉक्टरांसह सुरक्षारक्षकावर हल्ला करण्यात आलेल्या घटनेचा निषेध करुन निवासी डॉक्टरांच्या संघटनेने डॉक्टरांना संरक्षण देणारा कायदा तयार करण्याची मागणी दिनांक १६ ऑक्टोंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील डॉक्टरावर प्रामुख्याने निवासी डॉक्टर तसेच सुरक्षारक्षकावर रुग्णांचे नातेवाईकामार्फत मारहाण करण्याच्या घटना वारंवार घडत असल्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना ठराविक वेळेतच येण्याकरीता पास पध्दत आणि मारहाणीच्या व अन्य आपातकालीन घटनांच्या वेळी संबंधित यंत्रणांनी तात्काळ सतर्क होऊन डॉक्टर्स व समवैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या मदतीसाठी त्वरीत सहाय्य करण्यासाठी अर्लाम सिस्टिम बसविण्याबाबत शासनाने कोणती आवश्यक उपाययोजना/कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बा.य.ल. नायर रुग्णालयात निवासी डॉक्टरांसह सुरक्षारक्षकांवर हल्ला झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

(२) व (३) यानुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे :-

- सदर हल्ल्याबाबत आग्रीपाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
- रुग्णांच्या नातेवाईकांना ठराविक वेळेतच येण्याकरीता पास पध्दत राबविण्यात येत आहे.
- मारहाण व अन्य आपत्कालीन घटनांच्या वेळी संबंधित यंत्रणांनी तात्काळ सतर्क होऊन डॉक्टर्स व समवैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या मदतीसाठी त्वरीत सहाय्य करण्याकरीता अर्लाम सिस्टीम बसविण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यात आलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे :-

- दिनांक ०१/०२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील जिल्हा रुग्णालयांमध्ये डॉक्टर्स व इतर निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेकरीता सर्व आरोग्य संस्थांमध्ये सी.सी.टी.व्ही. बसविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १९/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये, राज्यातील रुग्णालयात बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी सुरक्षारक्षकांच्या सेवेकरीता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यत देण्यात आली आहे.

वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत करण्यात आलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे :-

- शासनाने दिनांक ११/०८/२०१९ रोजी पारीत केलेले The Maharashtra Medicare Service Persons and Medicare Service Institution (Prevention of Violence and Damage or Loss to Property) Ordinance, २००९ हे शासकीय/महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालयाच्या नजीकच्या

सर्व पोलीस ठाण्यांना पुढील अंमलबजावणीकरीता उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

- सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय संलग्नीत रुग्णालयात महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची १८०० सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले आहेत.
- सर्व शासकीय/महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयात रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांकरीता पास सिस्टीम सुरु करण्यात आली असून रुग्णांसोबत फक्त ०२ नातेवाईक सोडण्यात येत आहेत.
- संवेदनशील ठिकाणी सी.सी.टी.व्ही. ची संख्या वाढविण्यात आली आहे.
- सर्व शासकीय/महानगरपालिकेशी संलग्नीत रुग्णालयात होणाऱ्या अनुचित घटना वेळेत रोखण्याकरीता अलार्म सिस्टीम बसविण्यात आली आहे.

मुंबई-नागपूर महामार्गाची दुरवस्था झाल्याबाबत

(११) * ८०५ श्री.अंबादास दानवे : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापुर (जि.औरंगाबाद) येथून जाणाऱ्या ५७ कि.मीच्या समृध्दी शिघ्रसंचार महामार्गाच्या कामासाठी बेसुमार गौणखनिजासह बांधकाम साहित्याची वाहतूक करणाऱ्या १०० अवजड वाहनांची दिवस रात्र होणाऱ्या फेऱ्यांमुळे तालुक्यातील प्रमुख रस्त्यांसह ग्रामीण भागातील अंतर्गत रस्त्याला जोडणाऱ्या मार्गावर २० फूट रुंद अन् ३५ फूट लांब खड्डयासह संपूर्ण रस्ताची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ते दुरुस्तीसाठी दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी शिल्लक नसल्यामुळे रस्ते दुरुस्तीचे काम प्रलंबित असून उक्त मार्गावरुन धावणाऱ्या ७० टक्के वाहनधारकांना आपला मार्ग बदलावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रस्ते दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही,

सदर खराब झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती हिंदु ह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गाचे पॅकेज १० चे ईपीसी कंत्राटदारामार्फत करण्यात आलेली आहे व करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत सदर रस्त्यावरुन सर्व वाहनांची वाहतूक सुरळीत चालू आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महापालिकेच्या 'बीएसयूपी' योजनेतील इमारतीमधील घरांचा ताबा बनावट लाभार्थांनी घेतल्याबाबत

(१२) * ३१ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरातील रस्ता रुंदीकरण तसेच विविध प्रकल्पामध्ये कायमस्वरूपी विस्थापित झालेल्या कुटुंबियांना ठाणे महापालिकेच्या बीएसयूपी योजनेंतर्गत सदनिकांचे वाटप महापालिकेच्या स्थावर मालमत्ता विभागामार्फत करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे महापालिकेच्या बीएसयूपी योजनेतील घोडबंदर रोडवरील तुळशीधाम, धर्मवीरनगर येथे काही बनावट नागरिकांनी इमारतीतील सदनिकांची टाळे तोडून अनधिकृत ताबा घेतल्याचे तसेच महापालिकेच्या बनावट लेटरहेडवर बनावट ताबा पावती बनवून त्यावर स्थावर मालमत्ता विभागाचे कार्यालयीन अधीक्षक श्री.महेश आहेर यांच्या बनावट स्वाक्षऱ्या केल्याचे माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) होय, हे खरे आहे.

ठाणे शहरातील रस्ता रुंदीकरण प्रकल्पामध्ये विस्थापित झालेल्या कुटुंबियांना ठाणे महानगरपालिकेच्या सन २०१६ च्या पुनर्वसन धोरणानुसार पात्र-अपात्र लाभार्थी निश्चित करून विहित शुल्क आकारुन महापालिकेच्या बी.एस.यु.पी. योजनेंतर्गत सदनिकेचे वाटप करून कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यात येते.

(२) व (३) ठाणे महानगरपालिकेच्या तुळशीधाम, धर्मवीरनगर येथील बी.एस.यु.पी. योजनेंतर्गत बी-२ इमारतीमध्ये बनावट ताबा पावतीच्या आधारे अनधिकृत ताबा घेतल्याची बाब ३ सदनिकांमध्ये झाल्याचे महापालिकेच्या माहे डिसेंबर, २०१९ मध्ये निदर्शनास आले होते.

तसेच त्याच इमारतीत महापालिकेमार्फत सदनिकेस लावण्यात आलेले मूळ कुलूप बदलल्याचे व ३ सदनिकांमध्ये अंतर्गत नुतनीकरणाचे काम सुरु असल्याचे देखील निदर्शनास आले होते.

ठाणे महानगरपालिकेने या प्रकरणी खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे :-

- महापालिकेमार्फत अशा एकूण ११ सदनिकावर कारवाई करून त्या सील बंद करून ताब्यात घेण्यात आल्या आहेत.

- तथापि, वरील घटनाक्रमासंदर्भात पोलीस स्टेशन, ठाणे येथे दिनांक २४/१२/२०१९ रोजी रितसर तक्रार नोंदविण्यात आली असून संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
- तसेच अशा प्रकारच्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी ठाणे महानगरपालिकेमार्फत स्थानिक वर्तमानपत्राव्दारे जाहीर प्रकटन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्ह्यातील बिंदुसरा नदीवर पूल कम बंधारा बांधण्याबाबत

(१३) * १०५२ श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा गत काही वर्षापासून सतत दुष्काळ व नापिकीमुळे मागासलेला असून उक्त शहरामधून वाहणाऱ्या बिंदुसरा नदीवरील पूल अतिशय जीर्ण झाल्याने तेथे नवीन पुल कम बंधारा बांधण्याकरीता तत्कालीन मुख्यमंत्री व केंद्रीय जलसंपदा मंत्री यांनी बैठक घेवुन मंजुरी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नदीवर पूल बांधण्यात आला आहे मात्र, बंधाऱ्याकरीता शासनाने निधी मंजूर केला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नदीवरील पूल कम बंधारा बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१), (२) व (३) हे खरे नाही.

बीड शहरामधून वाहणाऱ्या बिंदुसरा नदीवरील पूल जीर्ण झाल्याने सदर पूलाच्या ठिकाणी ब्रीज कम बंधारा बांधणे केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रस्तावित होते. परंतु राज्य शासनाकडून सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे प्रस्तुत स्थळाची पाहणी करण्यात आली. पाहणीअंती सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा तथा पाटबंधारे विभाग यांचेशी झालेल्या चर्चेत सदर जीर्ण पूलाच्या ठिकाणी ब्रिज कम बंधारा बांधणे व्यवहार्य नसल्याचे त्यांचेकडून सुचवून पूलाच्या वरच्या बाजूस ५०० मीटर अंतरावर ब्रीज कम बंधारा बांधणे योग्य राहील, असे सांगण्यात आले.

त्यानुसार भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांचेतर्फे सदर ठिकाणी हाती घेण्यात आलेल्या येडशी ते औरंगाबाद रा.म.क्र. २११ महामार्गाच्या चौपदरीकरणांतर्गत सदर कामाच्या वावात बदल करुन बिंदुसरा नदीवरील जीर्ण पूलाच्या ठिकाणी नवीन पूलाचे बांधकाम करण्यात आले आहे

व सदर पूल जुलै, २०१८ पासून वाहतुकीस खुला करण्यात आला आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात अनेक स्वराज्य संस्था क्षेत्रात उभारण्यात आलेली घरकुले विनावापर असल्याबाबत

(१४) * १०६२ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (आयएचएसडीपी) व शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविण्याच्या योजनेंतर्गत राज्यात अनेक स्वराज्य संस्था क्षेत्रात उभारण्यात आलेली घरकुले विनावापर असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घरे विनावापर असण्याची कारणे काय आहेत याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जितेंद्र आव्हाड : (१) केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु पुनरुत्थान अभियानांतर्गत IHSDP व BSUP या योजनांतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांपैकी सप्टेंबर, २०१८ अखेरपर्यंत २९,९५२ घरकुले अवितरीत होती.

(२) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान अभियान (JNNURM) अंतर्गत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या योजनांतर्गत बांधण्यात आलेली व विनावापर पडून असलेली घरकुले पात्र लाभार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

त्यानुषंगाने पुढील कार्यवाही म्हाडा तसेच संबंधित स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांच्यास्तरावरुन करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त कोळी समाज व शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करताना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणेबाबत

(१५) * ४५२ श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन १९७० मध्ये नवी मुंबईतील कोळी समाज आणि शेतकऱ्यांच्या जमिनी नवी मुंबईच्या विकासासाठी संपादित करताना स्थानिक भूमिपुत्रांना आगरी कोळी समाजाची वसाहत असलेली गावठाणे, समाज मंदिर, खेळाची मैदाने, मार्केट, गार्डन्स, शाळा अशा प्रकारच्या अनेक सोयी सुविधा देण्याच्या आश्वासनाची पुर्तता शासनामार्फत करण्यात आली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर सोयी सुविधा उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) हे खरे नाही.

नवी मुंबईतील विविध नोड्समधील सोयी सुविधांचे भूखंड सिडको संचालक मंडळाच्या मंजुरीनंतर वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन, विहित अटी व शर्तीनुसार पात्र संस्थांना वाटप करण्याचे सिडकोचे धोरण आहे.

नवी मुंबई मधील विविध नोडमध्ये १२.५% क्षेत्र योजनेच्या रेखांकनामध्ये समाज मंदिर, खेळाचे मैदाने, मार्केट, गार्डन्स, शाळा अशा प्रकारच्या सोयी सुविधांसाठी एकूण ४११ भूखंड रेखांकीत करण्यात आले आहेत. त्यानुसार विविध नोडमध्ये शालेय संस्थांना १६४ भूखंड, समाज मंदिरांकरीता एकूण १४ इमारती व १३ भूखंड रेखांकित करण्यात आले आहेत. याशिवाय, नवी मुंबईतील प्रकल्पबाधित नागरिकांनी स्थापन केलेल्या ३ संस्थांना सीबीडी बेलापूर सेक्टर २०, नेरुळ सेक्टर २६ व ऐरोली सेक्टर ८ येथे समाज मंदिराकरीता भूखंड तर शाळा, कॉलेज, मंदिर, व्यायामशाळा, महिलामंडळ इ. प्रयोजनासाठी एकूण ३१ भूखंड वाटप करण्यात आले आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

महानगरपालिका क्षेत्रातील श्वानांचे निर्बिजीकरण अत्यंत संथगतीने सुरु असल्याबाबत

(१६) * १९६ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, ॲड.हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील टिटवाळा पूर्व आणि पश्चिम भागात भटक्या श्वानांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून भटक्या श्वानांकडून तब्बल २० नागरिकांना चावा घेतल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे तसेच भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात भटक्या श्वानांच्या वावरामुळे एकाच दिवसात १० शाळकरी मुलांना पिसाळलेल्या श्वानांनी चावा घेऊन जखमी केल्याची घटना माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्यावतीने श्वानांचे निर्बिजीकरण अंत्यत संथगतीने सुरु असून ठाणे महानगरपालिका हद्दीत गत एक वर्षापासून श्वान निर्बिजीकरणाचा ठेका बंद असल्याची माहिती माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान ठाणे महानगरपालिकेच्या महासभेत आरोग्य विभागाने दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या परिसरातील नागरिकांच्या व शालेय विद्यार्थ्यांच्या जिवितास भटक्या व पिसाळलेल्या श्वानांमुळे निर्माण झालेला धोका लक्षात घेता स्थानिक स्वराज्य संस्थांकडून होत असलेल्या दुर्लक्षाबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच मुंबईतील भटक्या श्वानांचा उपद्रव कमी करण्यासाठी महापालिकेच्या श्वान नियंत्रण विभागातील कर्मचाऱ्याची रिक्त पदे भरण्याबाबत व भटक्या श्वानांचा उपद्रव कमी करुन निर्बिजीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) अंशत: हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये भटक्या श्वानांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी एकूण ७ संस्थांव्दारे श्वान निर्बिजीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यानुसार भटक्या श्वानांच्या उपद्रवाबाबत कार्यवाही प्रभावीपणे करण्यात येत आहे. तसेच ठाणे महानगरपालिकेने निविदा तरतुद संपुष्टात आल्याने नविन निविदेची प्रक्रिया सुरु आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत एकूण १०१ श्वानदंश लसीकरण केंद्राव्दारे जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनानुसार श्वानदंश बाधित रुग्णांना मोफत श्वानदंश लस दिली जाते. तसेच ठाणे महानगरपालिका हद्दीत प्राण्यांकरीता प्राणी मित्र संस्था व ठाणे महानगरपालिकामार्फत रेबीज लसीकरण मोहिम राबविण्यात येते. भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेनेही मे.युनिवर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटीमार्फत निर्बिजीकरण्याची कार्यवाही चालु झाली आहे.

मुंबईतील भटक्या श्वानांचा उपद्रव कमी करण्यासाठी महापालिकेच्या श्वान नियंत्रण विभागातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत प्रस्तावावर महानगरपालिकास्तरावर कार्यवाही सुरु आहे.

शासन निर्णय, दिनांक ११ नोव्हेंबर, २०१६ अन्वये श्वानांमुळे निर्माण होणाऱ्या समस्येकरीता प्राणी जन्म नियंत्रण-पर्यवेक्षण समित्या स्थापन करणे व श्वान नसबंदी संदर्भात सूचना सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलेल्या आहेत.

तसेच शासन परिपत्रक दिनांक २२ नोव्हेंबर, २०१६ अन्वये The Prevention of Cruelty of Animals Act व The Animal Birth Control (Dogs) Rules, २००१ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची सूचना सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना दिल्या आहेत.

शासन परिपत्रक दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१६ अन्वये राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रातुन श्वानदंशावरील लस मोफत देण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करुन अपघाताचे प्रमाण रोखण्याबाबत

(१७) * ७४० श्री.रविंद्र फाटक, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.कपिल पाटील, श्री.महादेव जानकर : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाच्या कामास विलंब होत असल्याने आणि ठिकठिकाणी निकृष्ट दर्जेचे काम करण्यात आले असल्याने माहे नोव्हेंबर, २०१९ अखेर ५०० पेक्षा अधिक नागरिकांचा अपघाती मृत्यू झाल्यामुळे तेथील नागरिकांनी दिनांक १७ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कल्हेगाव फाटा (ता.पनवेल, जि.रायगड) कर्नाळा अभयारण्यालगत रस्ता खचल्यामुळे कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली असून सदर महामार्गावरुन जड व अवजड वाहतूक होत असल्याने रस्त्यालगत संरक्षण भिंत बांधण्याबाबत मा.केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्हेगाव फाटा कर्नाळा अभयारण्यालगत खचलेल्या रस्त्यालगत तात्काळ संरक्षण भिंत बांधणेबाबत व मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे कामाला गती देण्याबाबत तसेच महामार्गाचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर महामार्गाचे काम करण्यास किती कालावधी लागणार असून अपघात रोखण्याकरीता वाहन नियमावलीचे पालन करण्याबाबत शासनस्तरावरुन काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) अंशत: खरे आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वरील पनवेल ते इंदापूर या कि.मी.००/०० ते कि.मी.८४/०० लांबीच्या चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीतील असून सदर काम प्रगतीपथावर असून या कामास विलंब झालेला आहे, हे खरे आहे व इंदापूर ते झाराप या कि.मी. ८४/०० ते ४५०/१७० लांबीतील चौपदरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडील राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत प्रगतीपथावर आहे. यातही भूसंपादनातील अडचणींमुळे काहीसा विलंब झाला आहे.

सदर काम दर्जेदार होण्यासाठी तांत्रिक सल्लागारांची/स्वतंत्र अभियंता/Authority Engineer यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांच्या देखरेखीखाली आवश्यक उपाययोजना वेळोवेळी करण्यात येऊन सदर महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या (MoRT& H) व IRC मानांकन व निकषानुसार सुरु आहे. यास्तव निकृष्ट दर्जाच्या कामामुळे ५०० पेक्षा अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे, हे खरे नाही.

प्रस्तुत प्रकरणी १७ जुलै, २०१९ दरम्यान आंदोलन झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) सदर काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारितील असून महामार्गावरील कल्हेगाव फाटा कर्नाळा अभयारण्यालगत खचलेल्या रस्त्याची सवलतदारामार्फत दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच रस्त्यावर सुरक्षा फलक व रस्त्यालगत संरक्षक कठडे (Crash Barrier) लावण्यात आले आहेत. याशिवाय सदर ठिकाणी रस्त्याच्या साईडपट्टीचे (Shoulders) आवश्यकतेप्रमाणे मजबुतीकरण करण्याबाबत व इतर आवश्यक उपाययोजना करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

(३) व (४) सदर महामार्गाच्या पनवेल ते इंदापूर (कि.मी.८४) लांबीतील चौपदरीकरणाचा प्रकल्पांतर्गत कल्हेगांव फाटा कर्नाळा अभयारण्यालगत आवश्यक त्याठिकाणी संरक्षक भिंत (Toe wall) बांधण्यात येत आहे.

तसेच पनवेल ते इंदापूर या लांबीतील महामार्गाचा रखडलेला प्रकल्प पुनरुज्जिवित करुन कामास गती देण्यासाठी केंद्र शासनाने विशेष निधी मंजूर केला आहे. त्यानुसार सवलतदार/कंत्राटदारांमार्फत होणाऱ्या चौपदरीकरणाच्या कामाची देखरेख व पाठपुरावा केला जात असून सदर काम 'डिसेंबर, २०२०' पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे, असे प्रकल्प संलाचक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ च्या (मुंबई-गोवा) इंदापूर ते झाराप या कि.मी. ८४/०० ते ४५०/१७० लांबीतील चौपदरीकरणाचे काम १० भागांमध्ये विभाजित करण्यात आलेले आहे. सदर कामापैकी २५० कि.मी.चे काम जून, २०२० पर्यंत व उर्वरीत सर्व कामासह ३६६ कि.मी.चे काम माहे मार्च, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सदर कामाच्या दर्जाबाबत अ.क्र. १ च्या उत्तरात नमूद केल्यानुसार सदर प्रकरणी कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच सदर महामार्गावरील अपघात रोखण्याच्यादृष्टीने स्वतंत्र रस्ता सुरक्षा तज्ञाची नियुक्ती करण्यात येऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्यात येत आहे.

(५) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ पनवेल ते इंदापूर या लांबीतील काम खाजगीकरणांतर्गत मे.सुप्रिम पनवेल इंदापूर टोलवेज प्रा.लि. ह्या सवलतदारामार्फत दिनांक १९/१२/२०११ पासून प्रगतीपथावर आहे. तथापि, सन २०१६ पर्यंत कर्नाळा पक्षी अभयारण्य व संवेदनक्षील क्षेत्र (Eco sensitive Zone कि.मी/००/०० ते कि.मी/२०/००) मधील राष्ट्रीय वन्यजीव मंडळ यांची मंजुरी प्राप्त होणे व मौजे काराव येथील भूसंपादन व वडखळ बाह्य वळणाकरीता मिठागराची जागा वाणिज्य एवं उद्योग मंत्रालय भारत सरकार यांचेकडून हस्तांतरीत होणे, मौजे नागोठणे व कोलेटी येथील सरकारी जागेवरील अतिक्रमण काढणे या प्रलंबित बाबींमुळे तसेच सवलतदाराच्या आर्थिक समस्यामुळे चौपदरीकरणाच्या कामास विलंब होऊन प्रकल्प रखडला होता. तथापि, सन २०१६ दरम्यान प्रलंबित परवानग्या मिळाल्यानंतर तसेच भूसंपादनाच्या प्रक्रियेला वेग मिळाल्याने व प्रकल्पाला पुनरूज्जीवित करण्यासाठी केंद्र शासनाकडून One time fund infusion Scheme अंतर्गत रुपये ५४० कोटींची आर्थिक मदत मंजूर करण्यात आल्यामुळे सदर काम माहे एप्रिल, २०१७ पासून सदर प्रकल्पाचे काम पुन्हा सुरु करण्यात आले असून सदर काम डिसेंबर, २०२० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

तसेच इंदापूर ते झाराप ८४/०० कि.मी. ते ४५०/१७० या लांबीतील चौपदरीकरणाच्या कामास भूसंपादनात झालेला विलंब तसेच जनतेच्या विविध अधिकच्या मागण्या, वन जमीन, कोकण रेल्वे ओलांडण्यासाठी लागणारी परवानगी इ. कारणांमुळे काहीसा विलंब झाला आहे. तथापि, जून, २०२० पर्यंत २५० कि.मी. व माहे मार्च, २०२१ पर्यंत उर्वरीत सर्व कामासह ३६६ कि.मी. काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

मालवण (जि.सिंधुदुर्ग) नगरपरिषदेतील कंत्राटी अभियंत्यांना नियमित करण्याबाबत

(१८) * ३८४ श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) नगरपरिषदेमध्ये गत २० वर्षे म्हणजेच सन १९९९ ते सन २०१९ पर्यंत कंत्राटी स्वरुपात खंडित/अखंडित सेवेने कार्यरत असलेल्या अभियंत्यांना डावलून तांत्रिक पदावरील इतर सर्व कर्मचाऱ्यांच्या अनियमित नेमणुका "खास बाब" म्हणून शासनाने नियमित केल्याची गंभीर बाब दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने खंडित/अखंडीत सेवेने कार्यरत असलेल्या अभियंत्यांना नियमित शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) सन १९९९ ते सन २०१९ या कालावधीमध्ये नगरपरिषद आस्थापनेवर कंत्राटी/रोजंदारी पध्दतीने कोणतेही कर्मचारी नियुक्त केलेले नाहीत, असे मालवण नगरपरिषदेने कळविले आहे.

तसेच उक्त कालावधीमधील कंत्राटी स्वरूपातील कोणत्याही नियुक्त्या शासनामार्फत नियमित केलेल्या नाहीत.

तथापि, दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील विविध नगरपरिषदा/नगरपंचायतीमध्ये दिनांक ११/०३/१९९३ ते दिनांक २७/०३/२००० या कालावधीत नियुक्ती होऊन कार्यरत असलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या समावेशनाचा निर्णय घेण्यात आला, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्टयपूर्ण योजनांसाठी अनुदान देण्याबाबत

(१९) * ९९५ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.मोहनराव कदम, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ३५८५६ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुवर्ण जयंती नगरोत्थान व इतर वैशिष्टयपूर्ण योजनांसाठी नगरपरिषदांना १० टक्के ते २० टक्के लोकवर्गणी भरावी लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बहुतांशी नगरपरिषदांची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने त्यांना लोकवर्गणी भरणे शक्य होत नाही व त्यामुळे प्रकल्प वेळेत पूर्ण होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील नगरपरिषदांना विविध वैशिष्टयपूर्ण योजनांसाठी पूर्ण अनुदान देण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) होय.

महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियानांतर्गत राज्यातील नगरपरिषदांच्या मंजूर प्रकल्पाना 'अ' वर्ग नगरपरिषदाना २५ टक्के, 'ब' वर्ग नगरपरिषद १५ टक्के, 'क' वर्ग नगरपरिषदा/नगरपंचायती यांना १० टक्के स्वहिस्सा भरणे क्रमप्राप्त आहे.

वैशिष्टयपूर्ण योजनेंतर्गत १० टक्के स्वहिस्सा भरणे क्रमप्राप्त आहे.

(२) हे खरे नाही,

बहुतांश नगरपरिषदा या नगरपरिषद निधीमधून त्यांचा स्वहिस्सा भरत असतात.

तसेच वित्त आयोगाच्या निधी मधूनही स्वहिस्सा भरणे अनुज्ञेय असल्याने स्वहिस्सा अभावी प्रकल्प वेळेत पूर्ण होत नाही असे म्हणता येणार नाही.

तसेच आवश्यकतेनुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी (मुन्फ्रा) च्या माध्यमातून सुलभ कर्ज देखील देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

(३) प्रकल्पासाठी आवश्यक स्वहिश्याचा निधी संबंधित नागरी स्थानिक संस्थेने उभरणे हा सुधारणात्मक उपाययोजनेचा भाग आहे.

त्याच धर्तीवर राज्य शासनाच्या उपरोक्त योजनांसाठी आवश्यक १० ते २५ टक्के स्वहिश्याचा निधी स्वनिधी, १४ वित्त आयोग किंवा सुलभ कर्जाव्दारे उभारणे क्रमप्राप्त अहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे बोर्ली कोळीवाडा (ता.मुरुड, जि.रायगड) येथील समुद्रालगत परिसरात धुपप्रतिबंधक बंधारा बांधण्याबाबत

(२०) * ८७२ श्री.जयंत पाटील : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बोर्ली कोळीवाडा (ता.मुरुड, जि.रायगड) येथील समुद्रालगत असणाऱ्या मच्छिमारांच्या घरांचे सन २०१७ ते सन २०१९ या तीन वर्षात झालेल्या अतिवृष्टी आणि समुद्राच्या मोठ्या उधाणाच्या व वादळांच्या लाटांच्या माऱ्यामुळे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोर्ली मोरापाडा परिसरात महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडून धूपप्रतिबंधक बंधारा मंजूर करण्यात येवूनही बंधाऱ्याचे काम अपूर्ण केल्यामुळे समुद्राच्या लाटांचा मारा समुद्रालगत असणाऱ्या घरांना बसून घरांचे नुकसान झाले असून धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे काम पूर्ण न केल्याने समुद्रालगतची घरे उध्वस्थ होऊन ग्रामस्थांवर बेघर होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मौजे बोर्ली कोळीवाडा येथील समुद्रालगत परिसरात धुपप्रतिबंधक बंधारा बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) होय.
(२) बोर्ली समुद्र किनाऱ्यावर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेमार्फत २०० मीटर लांबीचा बंधारा बांधण्यात आला आहे. उर्वरित ५०० मीटर लांबीमध्ये बंधारा बांधणे आवश्यक आहे.
(३) सदरचे काम सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई प्रवेशव्दारावरील टोल वसूली बंद करण्याबाबत

(२१) * ६२९ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३७८६७ ला दिनांक १ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य टोलमुक्त करुन मुंबई प्रवेशव्दार व मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर हलक्या वाहनांना सूट देण्याबाबत आर्थिक सुसाध्यता तपासण्यासाठी अप्पर मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीच्या प्राप्त अहवालानुसार टोल वसूली थांबविण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राज्य टोलमुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) हे खरे आहे.

(२) उक्त समिती अहवालानुसार :

१. मुंबई पथकर प्रवेश नाक्यांवर व मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील पथकर नाक्यावरील हलक्या वाहनांना व एसटी बसेसना सुट दिल्यास एकरकमी रुपये ६८६३.५८ कोटी अथवा ५ टप्यामध्ये दिल्यास रुपये ९४६३.०६ कोटी इतकी नुकसान भरपाई द्यावी लागेल.

२. तसेच हे पथकर नाके संपूर्णपणे बंद केल्यास एकरकमी रुपये १३३७९.७६ कोटी अथवा ५ टप्यामध्ये दिल्यास रुपये १८३४४.४३ कोटी इतकी नुकसान भरपाई द्यावी लागेल.

वरीलप्रमाणे सुट दिल्यास उद्योजकास द्यावयाची नुकसान भरपाई मोठी असल्याकारणाने याबाबतीत शासनाने उक्त टोल बंद न करण्याचा निर्णय घेतला आहे.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

राज्यात शासकीय सेवेतील जातीचे दावे अवैध ठरलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांना सेवेतुन दूर करण्याबाबत

(२२) * ३९४ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विनायकराव मेटे, श्री.अरुणभाऊ अडसड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय सेवेतील जातीचे दावे अवैध ठरलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांना सेवेतुन दूर करण्याचे आदेश मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने दिले असूनही उक्त आदेशाची अंमलबजावणी न करता अप्रत्यक्षरित्या शासन अशा कर्मचाऱ्यांना संरक्षण देत असल्याची बाब निदर्शनात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरक्षित पदावर सुमारे ६३ हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यापैकी १२५०० कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उच्च न्यायालयाने दिनांक २८ सप्टेंबर, २०१९ रोजी आदेश निर्गमित करुन ज्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहेत ती पदे रिक्त करावी व त्याच जातीच्या आरक्षणातुन उक्त पदे नव्याने भरली जाण्याची प्रक्रिया दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजीपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे : (१) हे खरे नाही.

अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत नियुक्त झालेल्या व सदर जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांसंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ६/०७/२०१७ च्या निर्णयाची व मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांच्या दिनांक २८/०९/२०१८ च्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक २१/१२/२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्याव्दारे ज्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे जातीचे दावे अवैध ठरले आहेत त्यांची पदे रिक्त करुन ती रिक्त झालेली पदे अनुसूचित जमातीच्या जात वैधता प्रमाणपत्रधारक उमेदवारांमधून भरण्याचे व जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(२) मंत्रालयीन विभागाकडून प्राप्त माहितीनुसार अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे ५२९८ असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) होय.

(४) व (५) विभागाच्या दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत नियुक्त झालेल्या व जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांची रिक्त केलेली पदे भरण्यासाठी कालबध्द कार्यक्रम राबविण्याचे आदेश देण्यात आलेले असल्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

दिंडोशी (गोरेगांव पूर्व) येथील खडकपाडा येथे म्हाडाच्या जागेवर अनधिकृत बांधकामे उभारण्यात आल्याबाबत

(२३) * ८३९ श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिंडोशी (गोरेगाव पूर्व) येथील खडकपाडा येथे म्हाडाच्या जागेवर अनधिकृत बांधकामे उभारली जात असल्याबाबत तेथील नागरिकांनी सातत्याने तक्रारी केल्या असतानाही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खडकपाड्यात माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये जेसीबीच्या सहाय्याने जमीन मोकळी करण्यात आल्यानंतर रातोरात २०० ते ३०० झोपड्या उभारण्यात आल्याबाबत स्थानिकांनी महानगरपालिका तसेच म्हाडाकडे लेखी निवेदनाव्दारे तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामे विनाविलंब कायमस्वरूपी निष्कासित करण्याचेदृष्टीने शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जितेंद्र आव्हाड : (१) हे खरे नाही.

गोरेगाव पुर्वेकडील दिंडोशी, खडकपाडा येथील स.क्र.२३९/१ (न.भू.क्र. ८२७ बी-१/अे-१ आणि अे-२) ही जमीन मुळची एफ.ई.दिनशा ट्रस्ट यांच्या मालकीची होती. सदरची जमीन नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमांतर्गत अतिरिक्त ठरुन सदरची जमीन त्यावरील अतिक्रमणासह म्हाडाच्या ताब्यात देण्यात आली. या जमिनीवर साई विसावा सह. गृह. संस्था नियोजित संरक्षित झोपडपट्टी आहे.

तसेच न.भू.क्र. ८२७ बी-१/अे-१ या जमिनीवरील न्यायालयीन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. त्यानंतर उक्त जमिनीवरील झोपड्यांचे बायोमॅट्रीक सर्वेक्षण म्हाडातर्फे जुलै, २०१९ मध्ये करण्यात आले. त्यानुसार सदर भूखंडावर ६५८ झोपड्या व २ मंदिर असल्याची नोंद करण्यात आली आहे. त्यानुषंगाने परिशिष्ट-२ निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तर न.भू.क्र. ८२७ बी-१/अे-२ या भुखंडावर मा.उच्च न्यायालयाचे स्थगिती आदेश आहेत. त्यामुळे सदर भुखंडावरील झोपड्यांचे सर्वेक्षण करण्यात आलेले नाही.

(२) न.भू.क्र. ८२७ बी-१/अे-२ या जमिनीच्या म्हाडाच्या मालकी हक्काबाबत मा.उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट आहे व त्यावर मा.उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेला आहे. माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये सध्या मालकी हक्कात नाव असलेले जया संतोष अंधेर यांचे प्रतिनिधी श्री.विजय सिंग चव्हाण यांनी सदर भुखंडावर तोडलेल्या इमारतीचे मटेरियल टाकून जेसीबीव्दारे पसरवण्याचे काम सुरु केले होते. सदर काम बंद करण्यात आले आहे, त्यानुषंगाने म्हाडातर्फे दिंडोशी पोलीस स्टेशन व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे.

(३) व (४) न.भू.क्र.८२७ बी-१/अे-१ या भुखंडावरील झोपड्यांचे परिशिष्ट-२ निर्गमित होताच अपात्र झोपडपट्टीधारकाचे बृहन्मुंबई मनपाच्या सहाय्याने निष्कासन करण्यात येईल.

तसेच, न.भू.क्र.८२७ बी-१/अे-२ या भागावरील मा.उच्च न्यायालयाचे स्थगिती आदेश रद्द झाल्यानंतर त्या जागेवर असलेल्या झोपड्यांचे ही बायोमॅट्रीक सर्वेक्षण करुन अपात्र झोपडपट्टीधारकाचे निष्कासन करण्यात येईल .

पुणे-मुंबई हायपरलूप प्रकल्पाबाबत

(२४) * ३७७ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३९९३० ला दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-मुंबई दरम्यान अतिवेगवान प्रवासासाठी सुमारे रुपये ७० हजार कोटी खर्चाचा प्रस्तावित हायपरलूप प्रकल्पाच्या सुरुवातीच्या टप्प्यातील गहुंजे ते ओझर्डे दरम्यान साकारण्यात येणाऱ्या चाचणी ट्राककरीता लागणाऱ्या संभाव्य जागाबाबत चर्चा करण्यासाठी दुबईतील "डीपी वर्ल्ड" या कंपनीच्या प्रतिनिधींची दिनांक ३ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, पुणे यांच्या समवेत प्राथमिक बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब्रिटीश उद्योजक आणि वर्जिन ग्रुपचे प्रमोटर रिचर्ड ब्रॅन्सन यांनी दिनांक १२ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांची भेट घेऊन सादरीकरण करुन चर्चा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बैठकीच्या अनुषंगाने हायपरलूप प्रकल्प राबविण्याकरिता शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर हायपरलूप प्रकल्पाचे एकंदरीत स्वरुप काय आहे, यासाठी किती निधीची आवश्यकता आहे व निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) उक्त बैठकीदरम्यान पुणे-मुंबई हायपरलूप प्रकल्पाचा आढावा घेण्यात आला आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सदर प्रकल्प स्वीस चॅलेज पध्दतीने सार्वजनिक-खाजगी तत्वावर राबविण्यात येणार आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकल्पासंदर्भात आर्थिक व इतर दायित्वे, जमीन संपादन, सवलती, जोखिम विश्लेषण व नियोजन यानुषंगाने महाराष्ट्र पायाभूत सूविधा विकास सक्षम प्राधिकरणाच्या (महाआडीया) स्तरावर छाननी प्रक्रिया सुरु आहे.

मुंबई महानगरपालिका क्षेत्रात बेकायदेशीररित्या वृक्ष तोड करण्यात आल्याबाबत

(२५) * १०२८ श्री.रामदास कदम, श्री.महादेव जानकर : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका क्षेत्रात गत १० वर्षांमध्ये ११ लाख झाडांची नोंद झाल्याचा दावा मुंबई महापालिकेने केला असून एका वर्षात महापालिकेच्या २४ वॉर्डापैकी एका वॉर्डात सरासरी ५ हजार झाडे गृहित धरल्यास प्रत्यक्षात १.२० लाख झाडांचे रोपण करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेने सादर केलेल्या आकडेवारीत फरक असल्याने विविध विकास प्रकल्प व बांधकामामध्ये लाखो झाडांची बेकायदेशीरपणे कत्तल करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यामध्ये गत ५ वर्षात किती झाडे तोडण्याची परवानगी देण्यात आली, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार किती झाडे लावण्यात आली व त्यापैकी किती झाडे जगली याबाबत शासनाने आढावा घेवून दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सन २००८ मध्ये केलेल्या वृक्ष गणणेनुसार महानगरपालिका क्षेत्रात एकूण १९,१७,८४४ इतके वृक्ष असून सन २०१६ मध्ये केलेल्या वृक्ष गणणेनुसार एकूण २९,७५,२८३ इतके वृक्ष आहेत.

(२), (३) व (४) विकास कामांतर्गत बाधित होणाऱ्या वृक्षांची कापणी वा वृक्ष पुनर्रोपीत करण्यास महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ नुसार परवानगी दिली जात असल्याचे तसेच दोषी आढळल्यास त्यांचेवर सदर अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे. महानगरपालिकेमार्फत सन २०१९-२०२० मध्ये ११४ जणांवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत गत ५ वर्षात विकास कामांतर्गत १३,४९५ वृक्ष कापण्याची परवानगी देण्यात आली आहे. कापण्यात आलेल्या वृक्षांच्या बदल्यात ३७,०३२ वृक्ष लागवड करण्यात आली असून त्यापैकी ३५,१२४ झाडे जिवित आहेत.

याशिवाय महानगरपालिका क्षेत्रात मियावाही पध्दतीने एकूण ३,६०,००० वृक्षांची लागवड करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

मराठवाडा विभागातील परभणी येथील मोबाईल कंपन्याकडून कर वसुली करण्याबाबत

(२६) * ६८२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १५०४० ला दिनांक १६ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागातील परभणी येथील मोबाईलच्या विविध कंपन्यांनी परवानगी न घेता उभारलेले अनधिकृत टॉवर तसेच शासनाचे कर न भरता करीत असलेले व्यवसाय इत्यादी कारणास्तव संबंधित कंपन्याविरूध्द कारवाई करण्यात यावी अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी प्रधान सचिव, नगरविकास यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९ दरम्यान मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ व सर्वोच्च न्यायालयाच्या काही निवाड्यांव्दारे कलम २६७(अ) प्रमाणे महानगरपालिका व नगरपालिका यांनी संबंधित दोषी मोबाईल कंपन्याविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे. (२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७ (अ) मध्ये अवैध बांधकाम असलेल्या इमारतीवर मालमत्ता कराच्या दुप्पट शास्ती लावण्याची तरतूद आहे.

त्यानुसार कर व शास्ती आकारल्यामुळे टॉवर ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रोव्हाइडर्स असोसिएशन, नवी दिल्ली व इतर यांनी उक्त कलमास, रिट याचिकेव्दारे (क्र.१२१८९/२०१९) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे आव्हान दिले आहे.

सदर याचिकेमध्ये मा.न्यायालयाने "पुढील दिनांकापर्यंत मोबाईल टॉवर्स निष्कासित/सिल न करण्याचे तसेच महानगरपालिकेने केलेल्या मुल्यांकनानुसार कराचा भरणा याचिकाकर्त्यांनी करणे क्रमप्राप्त असेल" असे आदेश दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१९ रोजीच्या सुनावणीत दिले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७ (अ) मधील तरतूदी व स्थायी समितीने पारित केलेल्या ठरावानुसार परभणी महानगरपालिकेकडून अधिकृत व अनधिकृत मोबाईल टॉवर्सना अनुक्रमे रुपये १५,०००/- व रुपये ३०,०००/- कर आकारणी करण्यात येत आहे.

मात्र, सदर कर आकारणी विरोधात इंडस टॉवर लिमिटेड, पुणे या कंपनीने मा.उच्च न्यायालयात याचिका (क्र.११३४५/२०१८) दाखल केली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे परभणी महानगरपालिकेने कळविले आहे.

मराठवाडा विभागातील नगरपरिषदा/नगरपंचायती यांच्या हद्दीत असलेल्या अधिकृत मोबाईल टॉवरर्सकडून नियमितपणे कर वसुल करण्यात येतो. तसेच, ज्या मोबाईल कंपनींनी परवानगी घेतलेली नाही, त्यांच्यावर अधिकृत टॉवर्सना आकारण्यात येणाऱ्या कराच्या दुप्पट इतकी शास्ती लावून दंडात्मक कार्यवाही करण्यात येत असल्याचे विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई येथील वांद्रे-वरळी सी-लिंकवर अत्याधुनिक रुग्णवाहिका व ट्रामा सेंटर उपलब्ध करणेबाबत

(२७) * ८३३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील वांद्रे-वरळी सी-लिंकवर रुग्णवाहिका व ट्रामा सेंटर असणे आवश्यक असल्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने राज्य रस्ते विकास महामंडळाला माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील महामार्ग व राष्ट्रीय महामार्गांवर अत्याधुनिक रुग्णवाहिका व ट्रामा सेंटर नसल्याने अपघातग्रस्तांना तात्काळ वैद्यकीय मदत मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) होय, हे खरे आहे.

वांद्रे-वरळी सागरी सेतुवर दिनांक २३/०१/२०२० पासून पथकर कंत्राटादारामार्फत सुसज्ज रुग्ण वाहिकेची सेवा उपलब्ध असून, जवळच्या लिलावती रुग्णालयात अद्ययावत व्यवस्था असल्याने ट्रामा केअरची आवश्यकता नाही. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ओझर्डे गावाजवळ ट्रामा सेंटर असून ३ सुसज्ज रुग्णवाहिका आहेत.

(२) हे खरे नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (सिव्हिल) क्र.२९५/२०१२ च्या अनुषंगाने दिनांक ३०/११/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार ट्रामा सेंटर स्थापन करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार राज्यातील महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर एकूण ५६ ट्रामा केअर सेंटर कार्यान्वित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला-गायगाव (जि.अकोला) रस्त्यावरील उड्डाण पुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(२८) * ९२१ श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला-गायगाव (जि.अकोला) या रस्त्यावरील उड्डाण पुलाच्या बांधकामाला ८ वर्षापूर्वी मंजूरी व निधी देण्यात आले असून निविदा प्रक्रियेमध्ये कंत्राटदारांशी कामांच्या कालमर्यादेबाबत केलेल्या कराराची मुदत संपुष्टात येऊनही सदर उड्डाण पुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार सदर उड्डाण पुलाचे काम त्वरित पूर्ण करण्याबाबत तसेच विलंबास जबाबदार असणाऱ्या कंत्राटदारांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) होय.

परंतु सदर कामास ६ वर्षांपूर्वी दिनांक २३/०१/२०१४ रोजी केंद्र शासनाने केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत मंजुरी दिली आहे. तद्नंतर रेल्वे विभागाकडून गाळे रचनेस (GAD) मंजूर झाल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक १७/१०/२०१६ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले. कामाची मूळ मुदत ही दिनांक १६/१०/२०१८ पर्यंत होती. सदर कालावधीमध्ये उपलब्ध जागेत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील काम पूर्ण करण्यात आले. तथापि, रेल्वे हद्दीतील काम रेल्वे विभागाने पूर्ण न केल्यामुळे त्यावर अवलंबून असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पोचमार्गाच्या २ गाळयांचे काम पूर्ण करता आले नाही.

(२) व (३) रेल्वे विभागाकडील रेल्वे हद्दीतील गाळयाचे काम अपूर्ण असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कामास विलंब होत आहे. सदर कामास दिनांक ३०/०६/२०२० पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे. विलंबास कंत्राटदार जबाबदार नसल्याने त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(२९) * ६५६ श्री.प्रशांत परिचारक, प्रा.अनिल सोले, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथे उभारण्यात येत असलेले उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाचे बांधकाम ठेकेदारांच्या दिरंगाई व निधी अभावी गत १२ वर्षापासून अपूर्णावस्थेत असून केवळ ४० टक्केच काम पूर्ण झाले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर काम वेळेत पूर्ण न करणाऱ्या दोषी ठेकेदारांवर कारवाई करुन उक्त काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) उपविभागीय पोलीस अधिकारी, मंगळवेढा या कार्यालयाकरीता प्रशासकीय इमारत बांधणे या कामाकरीता गृह विभागामार्फत दिनांक ५/३/२००८ रोजी रुपये १८.६० लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती. विलंबाने प्राप्त झालेला निधी, कामाच्या जागेतील बदल,

सुचविलेली अतिरिक्त कामे व जादा दराच्या निविदामुळे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता असून रुपये ४४.९५ लक्ष रकमेचे सुधारीत अंदाजपत्रक उपभोक्ता विभागाकडे सादर करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत दरवाजे, खिडक्या, रंगकाम, प्लंबिंग, विद्युतीकरण इ. कामे प्रलंबित असून सुधारीत मान्यता व निधी प्राप्त झाल्यानंतर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

नवी मुंबई येथील पाम बिच मार्गावरील इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र महानगरपालिकेने नाकारल्याबाबत

(३०) * ११४० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील पाम बिच मार्गावरील ११९ इमारती या सीआरझेड-२ च्या क्षेत्रात येत असल्याने संबंधित महानगरपालिकेने त्यांना भोगवटा प्रमाणपत्र नाकारल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी गत चार वर्षापासून नवी मुंबई महानगरपालिकेने व सिडको प्रशासनाने कोणतीही कार्यवाही न केल्याने संबंधित विकासकांची गैरसोय होत असल्यामुळे शासनाने सदर प्रकरणी त्वरीत चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात एकूण ११९ इमारतींचे बांधकाम सीआरझेड-२ क्षेत्राने बाधित होत असल्याने व त्यास महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथोरिटीचा (MCZMA) ना-हरकत दाखला नसल्याने त्यांना भोगवटा प्रमाणपत्र नाकारले, ही वस्तुस्थिती आहे.

(२) केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाने दिनांक १८/०३/२०१८ च्या अधिसूचनेव्दारे Post Facto Approval देण्यासाठी व केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करणेकरीता दिनांक ३०/०६/२०१८ पर्यंत मुदत दिली होती.

या संदर्भात महानगरपालिकेकडे एकूण ६१ प्रस्ताव प्राप्त झाले होते. हे सर्व प्रस्ताव MCZMA कडे Post Facto Approval साठी सादर करण्यात आलेले आहेत. याबाबत महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

सीआरझेडने बाधित होणाऱ्या इमारतींना केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडून मंजूरी मिळाल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारणीचे काम प्रलंबित असल्याबाबत

(३१) * २४८ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या अखत्यारीतील सिडकोव्दारा नवी मुंबईत उभारण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारणीचे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) व (२) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा प्रकल्प सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावर विकसीत करण्यात येत असून सदर प्रकल्पासाठी नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि. यांची सवलतधारक म्हणून निवड करण्यात आलेली आहे. सुरुवातीला किमान प्रवासी क्षमता १०

दशलक्ष प्रवासी प्रतिवर्ष (एम.पी.पी.ए.) आणि ०.२६ दशलक्ष इतक्या मालवाहतूक क्षमतेसह इतर आवश्यक सुविधा असणारा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टप्पा-१ चा विकास सन २०२१-२०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात मुख्यत: अमरावती व अहमदनगर येथील रस्त्याचे कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

(३२) * ११०५ श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, डॉ.परिणय फुके, श्री.अरुणभाऊ अडसड : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुख्यत: अमरावती येथील रिंग रोड, चांदुर रेल्वे मुख्य रस्ता, मार्डी रोड, अंजनगाव सुर्जी येथील मुख्य रस्ता तसेच अहमदनगर जिल्ह्यातील अमरापूर, पाथर्डी, कडा, कर्जत ते भिगवण या रस्त्यांची केंद्रीय मार्ग निधी व हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत मंजूर झालेल्या रस्त्याची कामे गत एक वर्षांपासून अधिकाऱ्यांच्या दिरंगाई व गैरव्यवहारामुळे प्रलंबित असून रस्त्याची गुणवत्ता तपासण्यासाठी स्वतंत्र अभियंता न नेमातच कोट्यवधींची देयके काढल्यामुळे राज्यातील १९६ रस्त्यांच्या कामाची तपासणी करण्याचा निर्णय सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे कामे अर्धवट होऊन वेळेत पूर्ण न झाल्यामुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झालेला असून रस्त्याच्या गुणवत्ता तपासणीसाठी स्वतंत्र अभियंता (इंडिपेंडेंट इंजिनियर) नियुक्त केला जावा व त्या अभियंत्याच्या अहवालानंतरच ठेकेदारांना देयके अदा करावीत असे बंधनकारक असताना केवळ कार्यकारी अभियंत्यांच्या आदेशावरून कोट्यवधीचे देयके अदा केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त देयके अदा करताना स्वतंत्र अभियंता व कार्यकारी अभियंता या दोन्ही पदाच्या ठिकाणी एकाच व्यक्तीने स्वाक्षऱ्या केल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर रस्त्याची कामे त्वरित पूर्ण करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच उक्त रस्त्याची प्रलंबित कामे केव्हापर्यंत पूर्णत्वास येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नात नमूद रस्त्यांवरील हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गतची कामे प्रगतीपथावर आहेत.

हायब्रीड ॲन्युईटी तत्वावर मंजूर असलेल्या राज्यातील निरनिराळया जिल्ह्यातील एकूण १९६ रस्त्यांच्या कामांची तपासणी करण्याच्या सूचना सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी दिनांक १४/०२/२०१९ च्या पत्रान्वये सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम यांना दिल्या आहेत.

(२), (३) व (४) सदर रस्त्यांची कामे प्रगतीत असल्याने नागरिकांमध्ये कोणताही असंतोष निर्माण झालेला नाही.

अमरावती सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागांतर्गत प्रश्नांकित रस्त्यांच्या हायब्रीड ॲन्युईटी तत्वांतर्गत मंजूर कामांच्या तपासणीकरीता स्वतंत्र अभियंता यांची शासनाकडून नियुक्ती करण्यात आलेली आहे. स्वतंत्र अभियंता यांनी देयके प्रमाणित केल्यानंतरच उद्योजकास देयके अदा करण्यात येतात. केंद्रीय मार्ग निधी किंवा इतर योजनेंतर्गत मंजूर कामांची तपासणीकरीता स्वतंत्र अभियंता नेमण्याची तरतूद नाही.

अहमदनगर सार्वजनिक बांधकाम मंडळांतर्गत प्रश्नांकित हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत मंजूर रस्त्यांच्या कामांवर गुणवत्ता तपासणे व देयके अदा करणे यासाठी स्वतंत्र अभियंत्यांची नेमणूक/ नियुक्ती होईपर्यंत हायब्रीड

ॲन्युईटीचे काम पाहणाऱ्या संबंधित कार्यकारी अभियंता यांनी स्वतंत्र अभियंता म्हणून कामकाज पाहण्याबाबत मुख्य अभियंता, नाशिक यांनी आदेशित केले असून, त्याप्रमाणे कार्यवाही झाली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत फेरीवाल्यांना पर्यायी जागा देण्याबाबत

(३३) * ११६८ श्री.जनार्दन चांदूरकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.रणजित पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.हरिसिंग राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक ४१९९६ ला दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रेल्वे स्थानकांशेजारी १०० मीटर अंतरापर्यंत फेरीवाल्यांनी बसू नये असा मा.उच्च न्यायालयाचा आदेश असतानाही शासनाकडून याबाबत अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई व राज्यात वाढते शहरीकरणात गरीब असंघटीत क्षेत्रातील कामगार व लोकांच्या वाढत्या गरजा लक्षात घेता शासनाच्या आदेशानुसार महानगरपालिकेने फेरीवाला क्षेत्र तयार करुन अधिकृत फेरीवाल्यांना परवाने देण्याचे धोरण आखले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई शहरासाठी फेरीवाला धोरण निश्चित करुन शहरातील इच्छूक फेरीवाल्यांकडून विविध अटी व शर्तीनुसार अर्ज मागविण्यात आल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, फेरीवाल्यांकडून एकूण किती अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी किती अर्ज पात्र ठरले आहेत तसेच फेरीवाल्यांसाठी शहरातील किती जागा महापालिकेने निश्चित केल्या आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन रेल्वे स्थानकाशेजारील फेरीवाल्यांचे अतिक्रमण हटविण्याबाबत तसेच सदरहू फेरीवाल्यांना पर्यायी जागा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) मा.न्यायालयाच्या दिनांक ०१/११/२०१७ रोजीच्या आदेशानुसार, रेल्वे स्थानकापासून १५० मीटर अंतरापर्यंतचे क्षेत्र ना-फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असून फेरीवालामुक्त ठेवण्याचे निदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निरीक्षक (अतिक्रमण निर्मुलन) यांना देण्यात आले आहेत. तसेच सदर परिसर ना-फेरीवाला क्षेत्र घोषित करण्यात आला असून रेल्वे स्थानकापासून १५० मीटर अंतरावर सीमांकन करण्यात आले आहे.

(२) केंद्र शासनाने पदपथ विक्रेते (उपजीविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) अधिनियम, २०१४ लागू केलेला असून राज्य शासनाने, महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी प्रसिध्द केलेले आहेत.

तद्नंतर सदर अधिनियमातील कलम ३८(१) मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना २०१७ दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी योजना प्रसिध्द केली आहे. यानुषंगाने फेरीवाला धोरणाच्या अंमलबजावणीची कार्यवाही स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत करण्यात येत आहे.

(३) हे खरे आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेस फेरीवाल्यांकडून ९९,४३५ अर्ज प्राप्त झाले असून आवश्यक कागदपत्रे व छाननी अंती सद्य:स्थितीत १५,३६१ पथविक्रेते पात्र झालेले आहेत.

मुंबई शहरामध्ये ४०२ रस्त्यांवर ३०,८३२ पथविक्री जागा निश्चित करण्यात आल्या आहेत.

पात्र पथविक्रेत्यांची संगणकीय नोंदणी करण्यात आली असून त्यांना नोंदणी प्रमाणपत्र, ओळखपत्र, पथविक्री जागांचे वाटप तसेच पथविक्री प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

रेल्वे स्थानकापासून १५० मीटर अंतरावरील परिसरात महानगरपालिकेमार्फत नियमितपणे प्रतिबंधक गस्त ठेवण्यात येत असून माहे एप्रिल, २०१९ ते माहे ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत १,३५,७९४ अनधिकृत फेरीवाल्यांवर महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अंधेरी-विलेपार्ले (मुंबई) येथे सब-वे ऐवजी पूल बांधण्याबाबत

(३४) * १७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, ॲड.हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या नियोजित डीपी प्लान सन २०३४ मध्ये प्रस्तावित अंधेरी-विलेपार्ले दरम्यान पुर्व पश्चिमेला जोडणारा अंडरग्राऊंड ४५ फुटाचा भुयारी सब-वे रेल्वेमार्गा खालुन जात असून उक्त सब-वे जवळ मोठा नाला असल्याने पावसाळ्यात पाणी भरण्याचा धोका संभवत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुर्वीही अंधेरी जोगेश्वरी दरम्यानच्या भुयारी सब-वेमध्ये पाणी भरले असून मालाड येथील सब-वेमध्ये सन २०१९ च्या पावसाळ्यात पाणी भरल्याने वाहनात अडकुन दोघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, तसेच मिलन सब-वेमध्ये वारंवार पाणी भरुन वाहतूक ठप्प होत असल्यामुळे सदर नियोजित सब-वे हा धोकादायक ठरणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विलेपार्ले पूर्व पश्चिम जोडणारा पुल हा ३० फुटाचा असून वाहतुकीस अपुरा ठरत असल्याने नविन प्रस्तावित सदानंद दणाईत हॉस्पिटल जवळील अंडरग्राऊंड सब-वे ऐवजी उक्त ठिकाणी पुर्व पश्चिमेस जोडणारा पूल बांधण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रस्तावित सबवे न बांधता त्याठिकाणी पूल बांधण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१), (२), (३), (४) व (५) मुंबईतील अंधेरी-विलेपार्ले दरम्यान पुर्व-पश्चिमेला जोडणारा ४५ फुट प्रस्तावित भुयारी सब-वे ऐवजी त्याठिकाणी पूल बांधण्याकरीता सल्लागाराची नेमणूक करण्यात येऊन, सल्लागाराच्या सल्ल्यानुसार पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत प्राधान्याने करण्यात येणार आहे.

सदर ठिकाणी प्रस्तावित सब-वे ऐवजी पूल बांधण्याचा प्रस्ताव असल्याने त्याठिकाणी पाणी भरण्याचा धोका संभवत नाही.

तसेच सदर ठिकाणी अस्तित्वात असलेल्या नाल्यातून दरवर्षीप्रमाणे गाळ काढून नाल्यातील पाणी सुलभरीत्या प्रवाही केले जात असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

हिंगोली शहरामध्ये भूमिगत गटार योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत

(३५) * १६५४ श्री.विप्लव बाजोरिया : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहरामध्ये जिल्हा रुग्णालय परिसरात सुरु असलेल्या भूमिगत गटार योजनेच्या कामामुळे अनेक ठिकाणी रस्त्यांचे खोदकाम करण्यात आले असून सदर भूमिगत गटार योजनेचे काम अत्यंत संथगतीने सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे काम निधी संपल्याने प्रलंबित असल्याकारणास्तव गंभीर रुग्ण घेऊन येणाऱ्या रुग्णवाहिकांना फेरी मारुन जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) हिंगोली भुयारी गटार योजनेस महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अंतर्गत मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर योजना ही विस्तृत स्वरुपाची असून सर्व उपांगनिहाय कामे ही ९५% पूर्ण झालेली आहे.

उर्वरित कामे अंतिम टप्प्यात असून दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे हिंगोली नगरपरिषदेचे नियोजन आहे.

(२) हे खरे नाही.

हिंगोली शहरातील जिल्हा रुग्णालय परिसरातील भुयारी गटार योजनेचे काम पूर्ण झालेले असून काम पूर्ण होताच संपूर्ण रस्ता रहदारीसाठी मोकळा करण्यात आलेला आहे.

(३) व (४) सदर प्रकल्पाचे काम दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे व संपूर्ण प्रकल्प कार्यान्वित करण्याचे हिंगोली नगरपरिषदेचे नियोजन आहे.

मुंबईतील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाच्या कामाबाबत

(३६) * १९३८ श्री.महादेव जानकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.आनंदराव पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक ४१६४२ ला दिनांक १८ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विशेषत: वरळी, ना.म.जोशी मार्ग व नायगाव येथील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचा निर्णय सुमारे चार वर्षांपूर्वी घेण्यात आला असून प्रत्यक्षात कामाला सुरुवात करण्यात आली नसून पुनर्वसन प्रकल्पाबाबतची प्रक्रिया अत्यंत संथगतीने सुरु असल्याने स्थानिकांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाकडून संक्रमण शिबिरांची यादी लागल्यानंतर काही स्थानिक संक्रमण शिबिरात स्थलांतरीत झाले असून संक्रमण शिबिरात स्थलांतरित न झालेल्या स्थानिकांवर म्हाडाकडून कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याने स्थलांतरीत झालेल्या स्थानिकांमध्ये असंतोष निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संक्रमण शिबिरासाठीचा करार नोंदणीकृत असावा, पुनर्वसन प्रकल्पातील सदनिकेचा नोंदणी करार तसेच देखभाल दुरुस्तीचा निधी जाहीर करावा अशा मागण्या रहिवाशांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाच्या संदर्भात घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे, चार वर्षांचा कालावधी होवूनही सदर कामास सुरुवात न होण्याची कारणे काय आहेत, त्यासंदर्भातील सद्य:स्थिती काय आहे व पुनर्विकासाच्या कामास केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे आणि बीडीडी चाळ पुनर्वसनाचे काम जलदगतीने करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जितेंद्र आव्हाड : (१) अंशत: खरे आहे.

ना.म.जोशी मार्ग, नायगांव व वरळी येथील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पांच्या बांधकामासाठी कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांना कार्यादेशही देण्यात आलेले आहेत. उक्त चाळीमधील रहिवाश्यांची पात्रता निश्चित करण्याचे काम सुरु आहे. प्रकल्प विरोधी रहिवाश्यांचा एक गट चुकीची माहिती पसरवत असून, अवाजवी मागण्याही करीत असल्याने, स्थानिक रहिवाश्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे सदरहू प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब लागत आहे.

(२) ना.म.जोशी प्रकल्पामधील जे भाडेकरु म्हाडाच्या संक्रमण शिबिरात स्थलांतरीत झालेले आहेत त्यांच्याकडून, संक्रमण शिबिरात स्थलांतरीत न झालेल्या भाडेकरुंविरुध्द कार्यवाही करण्याची मागणी होत आहे.

(३) अंशत: खरे आहे.

देखभाल दुरुस्ती निधी (Corpus Fund) जाहीर करण्याबाबत कोणतीही मागणी रहिवाश्यांनी अद्याप केलेली नाही.

(४) व (५) बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाचा प्रकल्प वि.नि.नि. ३३(९)(बी) नुसार राबविण्यांत येणार असून, त्याअंतर्गत निवासी पात्र गाळेधारकांना ५०० चौ.फु. चटई क्षेत्रफळाची सदनिका विनामूल्य व मालकी तत्वावर तसेच, चाळीबाहेरील पात्र निवासी झोपडीधारकांना महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील तरतुदीनुसार अन्य झोपडीधारकांप्रमाणे सदनिका विनामूल्य व मालकी तत्वावर अनुज्ञेय करण्यात आली आहे. बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी बांधकाम कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आली असून, कार्यादेश देखील देण्यात आलेले आहेत. भाडेकरुंची पात्रता निश्चित करण्याची कार्यवाही तीन सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अति/निष्का.) यांच्याकडून सुरु आहे. सदरहू प्रकल्पातील असहकार्य करणाऱ्या भाडेकरुंविरुध्द निष्कासनाची कार्यवाही करण्यासाठी नगरविकास विभागाने दिनांक २९/०८/२०१९ रोजी प्राथमिक अधिसूचना प्रसिध्द केलेली असून अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्याची कार्यवाही त्या विभागाकडून करण्यात येणार आहे.

पेल्हार धरणातील जलशुद्धीकरण केंद्रामधील यंत्रे देखभाल दुरुस्तीअभावी बंद असल्याबाबत

(३७) * २०३९ श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पेल्हार धरणाच्या जलशुद्धीकरण केंद्रातील आठपैकी पाच यंत्रे देखभाल दुरुस्ती अभावी दोन वर्षांपासून बंद असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार शहरातील प्रामुख्याने गोखिवरे, वालीव, राजावली, टिवरी, सातिवली आणि जुचंद्र या भागातील नागरिकांना दररोज १४ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करणाऱ्या पेल्हार धरणाच्या जलशुध्दीकरण केंद्रातील यंत्रे बंद असल्यामुळे नागरीकांना अशुध्द पाण्याचा पुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे यंत्र दुरुस्त करुन याप्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी वसई तालुक्यातील एका राजकीय पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्याने दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जलशुध्दीकरण केंद्रातील यंत्रे दुरुस्त करण्याबाबत कार्यवाही करुन सदर प्रकरणी दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) हे खरे नाही.

पेल्हार येथील जलशुध्दीकरण प्रकल्प कार्यान्वित असून त्याव्दारे प्रक्रिया केलेला पाणीपुरवठा शहरास करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे. तथापि, या केंद्रातील ६ प्रेशर फिल्टर व एक ५० एच.पी. क्षमतेचा पंप कार्यान्वित असून २ प्रेशर फिल्टर व २ पंप स्टँड बाय स्थितीत ठेवण्यात येतात.

(२) वसई विरार शहरातील गोखिवरे व वालीव या भागात पेल्हार पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाणीपुरवठा करण्यात येतो.

जुचंद्र, राजावली, टिवरी व नायगाव पुर्व या भागात सुर्या पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाणीपुरवठा करण्यात येतो. सदर भागात पुरविण्यात येणाऱ्या पाण्याची तपासणी शासन मान्य प्रयोग शाळेमार्फत व आरोग्य विभागामार्फत करण्यात आली असून सदरचे पाणी सामान्य व पिण्यास योग्य असल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, सातिवली भागात वितरण व्यवस्थेचे काम सुरू असल्याने तेथे नळजोडण्या दिल्या नाहीत.

(३) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले असून पाणी पुरवठ्याची गुणवत्ता व शुध्दता राखण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

(४) पेल्हार जलशुध्दीकरण केंद्र सुमारे ४० वर्षापुर्वी बांधण्यात आले आहे. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात पाणीपुरवठा करणेकरीता अस्तित्वात असलेल्या प्रल्हार योजनेच्या केंद्रातील जुने जलशुध्दीकरण केंद्र तोडून रॅपीड सँड फिल्टर पध्दतीने ७.५ एम.एल.डी. क्षमतेचे, अंदाजपत्रकीय किंमत रुपये २.८१ कोटीचे नवीन जलशुध्दीकरण केंद्र उभारण्यास सर्वसाधारण सभेने मंजूरी प्रदान केली असून निविदा प्रक्रिया सुरु असल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरात खाजगी ट्रॅव्हल्स बसला बंदी घालण्याच्या प्रस्तावास मंजूरी दिल्याबाबत

(३८) * २१२० श्री.प्रकाश गजभिये : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात स्मार्ट सिटी प्रकल्प राबविण्यात येत असतानाच महानगरपालिकेने रहदारीला अडथळा निर्माण होण्याच्या कारणाने शहरात प्रवासी वाहतूक करणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्स बसला बंदी घालण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्य शहरातून नागपूर येथे अंदाजे २५० ते ३०० ट्रॅव्हल्स बसेस येत असून ऑनलाईन तिकीट बुकिंगची सुविधा उपलब्ध असल्याने शहरात अंदाजे ५० ट्रॅव्हल्सचे थांबे आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार खाजगी बस हे प्रवाशांच्या सेवेसाठी असल्याने सदर खाजगी ट्रॅव्हल्स बसला बंदी न घालण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) महानगरपालिकेकडून असा कोणताही प्रस्ताव मंजूर झालेला नसल्याचे, नागपूर महानगरपालिकेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये येणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्स बसेस थांबण्यासाठी अद्याप ट्रॅव्हल्सचे थांबे निश्चित करण्यात आलेले नसल्याचे, महानगरपालिकेने त्यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

तथापि, शहरात विविध मार्गाने येणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्सच्या बसेसची व्यवस्था शहराबाहेर करण्याच्या उद्देशाने, नागपूर महानगरपालिकेने केलेल्या विनंतीस अनुलक्षून, शहर पोलीस उपायुक्त (वाहतूक) यांनी शहराच्या बाहेर बस थांबे निश्चित करण्याच्या उद्देशाने एकूण १० ठिकाणांची प्राथमिक माहिती संकलित केलेली असल्याचे पोलीस उपायुक्त (वाहतूक) यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत गैरव्यवहार झाल्याबाबत

(३९) * २२४० श्री.सुजितसिंह ठाकूर : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हा नियोजन वार्षिक योजनेत सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नगरविकास शाखेस लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत ९ कोटी ३५ लाख रुपये नगरपालिकेला देण्यासाठी दिले असता त्यांनी परस्पर गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायतीकडून प्रस्ताव न मागविता, निधी न देता तसेच अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता न घेता जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरविकास विभागाला कोणताही अधिकार नसताना नियमबाहय पध्दतीने निविदा प्रक्रिया केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विभागामार्फत कोणत्याही साहित्याचा पुरवठा न करता पैसे वाटप करण्यात आले असून सदर गैरव्यवहार लपविण्याकरीता नगरपरिषद व नगरपंचायतीना साहित्य पुरवठा करण्यास सुरुवात झाली असल्याने सदर साहित्य पुरवठा थांबवून संबंधितावर त्वरित गुन्हा दाखल करावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) व (२) उस्मानाबाद जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षातील जिल्हा नियोजन समितीमार्फत नगरविकास शाखेस प्राप्त निधीच्या विनियोगात गैरव्यवहार झाल्याचे जानेवारी, २०२० च्या सुमारास निदर्शनास आलेले आहे.

(३) होय.

(४) व (५) सदर प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १७/०१/२०२० च्या आदेशान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर चौकशी समितीच्या दिनांक २९/०१/२०२० अन्वये सादर केलेल्या प्राथमिक चौकशी अहवालानुसार तत्कालीन जिल्हा प्रशासन अधिकारी तथा तहसिलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना दिनांक २९/०१/२०२० अन्वये निलंबित करण्यात आलेले आहे. मा.लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक २७/०१/२०२० च्या निवेदनाच्या अनुषंगाने अपर विभागीय आयुक्त-१, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली स्वतंत्र चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी उपरोक्त दोन्ही समित्यांमार्फत चौकशी सुरु आहे.

मुंबईतील कारखाने/गोदामे व वस्त्यांकरिता अग्नि सुरक्षिततेच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत

(४०) * १७४ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामनिवास सिंह, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रामदास कदम, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अरुणकाका जगताप, श्री.महादेव जानकर : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला (मुंबई) पश्चिमेकडील खैरानी रोडवरील थिनरच्या कारखान्याला आग लागल्याने १५ ते २० गोदामे जळून खाक झाली असून दोन जणांचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी म्हणजेच दिनांक १२ डिसेंबर, २०१९ रोजी याच परिसरात एका फरसाणाच्या कारखान्याला आग लागल्याची घटना घडली असून मुंबई शहरात दाटीवाटीने वसलेल्या वस्त्यांसह गोदामांनी अग्निसुरक्षेकडे दुर्लक्ष केल्यामुळे आगी लागण्याचे प्रमाण वाढले असून मुंबईमध्ये गत दहा वर्षात ४८ हजार ४३४ आगी लागून ६०० जणांना जीव गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरातील कुर्ला, साकीनाका तसेच ठाणे भिवंडी इत्यादी भागात असलेल्या अवैध गोदामांच्या बांधकामाबाबत शासनाकडे अनेक वेळा तक्रार करुनही शासन त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अवैध गोदामांसोबत, अवैध रासायनिक कारखाने, हॉटेल्स इ. आस्थापनांची तपासणी करुन बेकायदेशीर गाळे व गोदामे बंद करण्यात येणार आहे काय व त्यानुसार आजपर्यंत एकूण किती गोदामांवर किंवा गाळयांवर कारवाई करण्यात आली आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील अवैध गोदामांवर कारवाई करण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनातील अधिकाऱ्यांवर कारवाई करुन गोदामांच्या अग्निसुरक्षेच्यादृष्टीने संभाव्य धोके, जिवित व वित्तहानी यापासून बचाव करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) मुंबईतील असल्फा व्हिलेज, घाटकोपर (पश्चिम) येथील खैरानी रोडवरील २९ गाळ्यांना दिनांक २७/१२/२०१९ रोजी आग लागून दोन व्यक्तींचा मृत्यू झाला ही वस्तुस्थिती आहे.

(२) खैरानी रोडवरील एका फरसाणाच्या कारखान्याला दिनांक १२/१२/२०१९ रोजी आग लागली होती ही वस्तुस्थिती आहे.

मुंबईमध्ये सन २००८ ते माहे डिसेंबर, २०१९ या कालावधीत ५६,१४५ आगीच्या घटना घडल्या असून त्यामध्ये ६७७ जणांचा मृत्यू झाला आहे.

(३), (४), (५) व (६) खैरानी रोड, कुर्ला, मुंबई येथील आगीच्या दुर्घटनेनंतर तेथील २५० गाळ्यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी ८१ गाळ्यांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ अन्वये नोटीस बजाविण्यात आल्या असून दोषी व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच सदर परिसर महानगरपालिकेमार्फत निरीक्षणाखाली ठेवण्यात आला आहे.

विजेच्या सदोष जोडणी/तारांमुळे उद्भवणाऱ्या घटनांना आळा घालण्यासाठी, वीज पुरवठा करणाऱ्या संस्था/कंपनींना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ३० अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांच्या सुमारे २१०० पेक्षा जास्त प्रकरणांवर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३(१) अन्वये नोटीस बजाविण्यात आल्या असून निष्कासनाची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कळविले आहे.

नागपूर शहरातील महानगरपालिकेच्या शाळा बंद असल्याबाबत

(४१) * ७३५ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुजितसिंह ठाकूर : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठी भाषिक शासकीय शाळा वाचवा अभियानांतर्गत शासकीय शाळा वाचवा संयुक्त कृती समितीतर्फे नागपूर येथे चिपको आंदोलन करण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरातील महानगरपालिकेच्या १९१ पैकी ५२ शाळा बंद करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महानगरपालिकेच्या पटसंख्ये अभावी बंद केलेल्या सर्व शाळा पुन्हा चालू करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) विद्यार्थ्यांच्या पटसंख्येअभावी, मागील २५ ते ३० वर्षात महानगरपालिकेच्या ५२ शाळा टप्प्याटप्प्याने बंद झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

बंद झालेल्या सर्व शाळांच्या परिसरात, महानगरपालिकेच्यावतीने विद्यार्थी सर्व्हेक्षण सुरु करण्यात आलेले असून, आवश्यक पटसंख्या प्राप्त झाल्यास, संबंधित शाळा सुरु करण्यात येणार आहेत.

कल्याण-डोंबिवलीतील अनधिकृत बांधकामांना परवानगी देण्यात आल्याबाबत

(४२) * ५४० ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील अधिकाऱ्यांनी कल्याण परिसरात बांधकामांना परवानगी देताना नियमांचे उल्लंघन केल्या प्रकरणी त्यांची चौकशी करण्याचा प्रस्ताव लाचलुचपत विभागाने नगरविकास विभागाला पाठविला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगररचना विभागाला दुरुस्ती परवानगी देण्याचे अधिकार नसताना कल्याण (प.) येथे नवीन अनधिकृत बांधकामांना परवानग्या देण्याचे प्रयत्न संबंधित विभागाकडून केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) प्रस्तुत प्रकरणी श्री.कौस्तुभ गोखले यांच्या दिनांक १४/०१/२०१९ च्या तक्रारीच्या अनुषंगाने अपर महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचे दिनांक २०/०४/२०१९ चे पत्र नगरविकास विभागास प्राप्त झाले, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) उपरोक्त प्रस्तावास अनुसरून आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचे अभिप्राय मागविण्यात आले असता त्यांचे अभिप्राय दिनांक ३०/०५/२०१९ व दिनांक २०/११/२०१९ च्या पत्रान्वये प्राप्त झाले.

आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या अभिप्रायानुसार महानगरपालिका क्षेत्रातील ४००० चौ.मी. क्षेत्रापर्यंतच्या भूखंडास बांधकाम परवानगी, वापर बदल करण्यास मंजूरी देण्याचे अधिकार सहायक संचालक

नगररचना व ४००० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्राच्या भुखंडास बांधकाम परवानगी, वापर बदल करण्यास मंजूरी देण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना आहेत.

प्रस्तुत तक्रार अर्जावर बाजारपेठ पोलीस ठाणे, कल्याण यांनीही चौकशी केली असून त्यांनी तक्रार निकाली काढली आहे तसेच विद्यमान सहायक संचालक नगररचना यांच्या एकसदस्यीय समितीनेही प्रस्तुत प्रकरणी केलेली कार्यवाही ही नियमोचित असून तक्रारदाराची तक्रार वस्तुस्थितीवर आधारीत नसल्याचे निष्कर्ष काढलेले आहेत.

महापालिकेकडे बांधकाम मंजूरीसाठी प्राप्त प्रस्तावास भूखंडाच्या क्षेत्रानुसार व विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदींनुसार सहायक संचालक नगररचना व महानगरपालिका आयुक्त यांच्या अधिकारान्वये मंजूरी देण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शितल इस्टेट, मुंबई येथे जुन्या चाळींच्या पुनर्विकास योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

(४३) * ११२५ डॉ.परिणय फुके : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मौलाना शौकत अली मार्गावरील शितल इस्टेट मधील उपकरपात्र जुन्या चाळींचा पुनर्विकास करताना माहे मार्च, २०१४ मध्ये मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ३० महिन्यात घरे बांधून देण्याची अट असूनही विकासकाने काम सुरु केले नसून कलम ९५(अ) म्हाडा कायदा, १९७१ अन्वये नोंदणीकृत करारनाम्याप्रमाणे भाडेकरुंना १२ महिन्याचे भाडे पहिल्या महिन्याच्या आधी देण्याची अट असूनही सर्व भाडेकरुंचे दहा ते सहा महिन्यांचे भाडे विकासकाने दिले नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फेरीवाले, घरकामगार महिला, हमाल, छोट्या नोकऱ्या, रोजंदारी करणाऱ्या असंघटित भाडेकरुंना संक्रमण काळासाठी लिव्ह लायसन्सने घेतलेल्या जागेचे भाडे देणे शक्य होत नसल्यामुळे भाडेकरुंनी मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिनांक २ मार्च, २०१९ रोजी पत्र देवूनही विकासकाने भाडे दिले नसल्याचे निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दिनांक १९ मार्च, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत विकासकाने माहे एप्रिल, २०१९ अखेर भाडे देण्याचे मान्य करुनही भाडे दिले नसल्यामुळे दिनांक ३ मे, २०१९ रोजी उपाध्यक्ष, म्हाडा यांना पत्र देऊनही म्हाडा अधिकाऱ्यांनी कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे दिनांक ४ डिसेंबर, २०१९ रोजी लोकप्रतिनिधीने मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळ यांना ७ दिवसांच्या आत भाडेकरुंना भाडे देण्याची नोटीस दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माहे एप्रिल, २०१४ पासून भाडेकरु लिव्ह लायसन्सने राहत असल्यामुळे विकासकाला दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करुन म्हाडाने घरे बांधुन देणे आवश्यक असताना त्यांची घरे विकासकाला देण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या दोषी अधिकारी व विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जितेंद्र आव्हाड : (१) व (२) होय, हे खरे आहे. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांच्या अहवालानुसार, सदर चाळींच्या पुनर्विकासाचे काम अद्याप सुरु झालेले नाही. तसेच, भाडेकरुंना नियमित भाडे मिळत नसल्याची तक्रार भाडेकरु/रहिवाशांकडून मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचेकडे प्राप्त झाली आहे.

(३) भाडेकरुंच्या तक्रारीवर मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांनी दिनांक १९/०३/२०१९ रोजीच्या घेतलेल्या बैठकीत विकासकाने एप्रिल, २०१९ अखेर भाडे देण्याची कबुल करुनही आश्वासनपुर्ती न केल्यामुळे, विकासकास मंडळाकडून दिनांक १३/०६/२०१९ रोजी नोटीस देण्यात आली आहे. तसेच, मा.सभापती, दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचेकडे दिनांक १८/०६/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत भाडेकरु/रहिवाश्यांचे भाडे तातडीने देण्याबाबतचे आदेश मा.सभापती यांनी दिले आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी (जि.ठाणे) येथील आदिवासी कुटुंबियांना न्याय मिळणेबाबत

(४४) * १२७१ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील बांधकामासंदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेत मा.उच्च न्यायालयाने तालुक्यातील अनेक कामे अनधिकृत ठरवून अशा अनधिकृत बांधकामासंदर्भात कारवाई करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील पोगाव व भाडेगाव येथील आदिवासी पाड्यावर राहणाऱ्या १३० आदिवासी कुटुंबियांच्या घरांवर भिवंडी महानगरपालिकेच्यावतीने कारवाई करण्यात आली असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदिवासी कुटुंबे गत तीन पिढयांपासून त्याच ठिकाणी राहत असल्यामुळे त्यांना महापालिकेच्या कारवाईमधून वगळावे अशी आयुक्त, भिवंडी महानगरपालिका, जिल्हाधिकारी, ठाणे तसेच प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांना निवेदने देऊन मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर आदिवासी कुटुंबियांना न्याय देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) होय, हे खरे आहे.

(२) भिवंडी-निजामपूर महानगरपालिका क्षेत्रांतर्गत मौजे ब्राम्हणपाडा, म्हसकरपाडा, पोगांवपाडा येथील एकूण २५ व मौजे भादवड येथील एकूण १३२ बांधकामे अनधिकृत घोषित करुन सदरची बांधकामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार निष्कासित करण्याचे भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, सदर अनधिकृत बांधकामांच्या निष्कासनाच्या कारवाई दरम्यान तेथील रहिवाशांनी केलेल्या प्रचंड विरोधामुळे निष्कासनाची कारवाई करणे शक्य झाले नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) मौजे पोगांव व मौजे भादवड परिसरातील जुनी घरे व वाढती लोकसंख्या विचारात घेऊन भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेने सदर क्षेत्राचा मंजूर विकास योजनेनुसार असलेल्या हरीत क्षेत्राचा वापर विभाग बदलून तो रहिवास वापर विभाग करण्याचा महासभा ठराव क्रमांक २१४, दिनांक १७ नोव्हेंबर, २०१९ अन्वये निर्णय घेतला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने उक्त फेरबदलासाठी दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर नोटीसवर सूचना व हरकती प्राप्त झाल्यानंतर, उक्त फेरबदलाबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव प्राप्त झाल्यानंतर, त्यावर गुणवत्तेनुसार निर्णय घेण्याची शासनाची भुमिका आहे.

लोकमान्य टिळक रुग्णालय शीव, मुंबई येथे 'मेट्रो ब्लड बँक' व हृदयरोग शस्त्रक्रिया विभाग कार्यान्वित करण्याबाबत

(४५) * १०४६ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.रामनिवास सिंह : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकमान्य टिळक रुग्णालय शीव, मुंबई परिसरात 'मेट्रो ब्लड बँक' सुरु करण्याचा प्रस्ताव सन २००९ पासून प्रलंबित असल्याची गंभीर बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर रुग्णालयातील हृदयरोग शस्त्रक्रिया विभागही दोन महिन्यांकरिता बंद करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रुग्णालयाच्या परिसरात तातडीने 'मेट्रो ब्लड बँक' सुरु करणे तसेच हृदयरोग शस्त्रक्रिया विभाग पुन्हा कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) हे खरे आहे.

मुंबई, दिल्ली, कलकत्ता आणि मद्रास या ठिकाणी "मेट्रो ब्लड बँक" सुरु करण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या आरोग्य विभागाने घेतला होता.

सदर निर्णयास अनुसरुन, मेट्रो ब्लड बँक सुरु करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत लोकमान्य टिळक मध्यवर्ती सर्वसाधारण रुग्णालयातील जागा एड्स नियंत्रण संस्थेच्या ताब्यात देण्यात आली आहे.

(२), (३) व (४) लोकमान्य टिळक मध्यवर्ती सर्वसाधारण रुग्णालयाच्या हृदयरोग शस्त्रक्रिया विभागातील वातानुकूलित यंत्रणा २१ वर्षे जुनी असल्याने त्यामध्ये वारंवार बिघाड होत आहे.

सदर यंत्रणा बदलण्याचे काम महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आले असून, सदर काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे हृदयरोग शस्त्रक्रिया विभाग तात्पुरता बंद ठेवण्यात आला आहे.

तथापि, रुग्णालयातील रुग्णांच्या अत्यावश्यक शस्त्रक्रिया के.ई.एम., नायर व जे.जे. रुग्णालय येथे करण्यात येत आहेत.

मुंबई व ठाणे येथील धोकादायक इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

(४६) * ४८७ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व मुंबई उपनगरात गत ५ वर्षात इमारत कोसळण्याच्या २,७०४ घटना घडल्या असून त्यात २३४ जणांचा मृत्यू तर ८४० जण जखमी झाल्यामुळे सदर घटना टाळण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या पुनर्विलोकन समितीमध्ये ३३ सल्लागार सदस्यांची नियुक्ती करण्यात आली असून सदर समितीच्या माहे मार्च, २०१७ ते मार्च, २०१९ या दोन वर्षाच्या काळात सल्लागारांची एकही बैठक झाली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली येथील अनेक इमारती धोकादायक असून जिवितहानी होऊ नये याकरीता इमारतींच्या पुनर्विकासासाठी शासनाने योजना राबवावी ह्या मागणीकरीता तेथील रहिवाशी सातत्याने आंदोलने करीत असल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे तसेच मुंबईतील कामाठीपुरा येथे म्हाडा प्राधिकरणाने सन २०१६ मध्ये समूह पुनर्विकासांतर्गत प्रकल्प उभारण्याची तयारी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून एकही बैठक न घेण्याची कारणे काय आहेत, बैठक घेतली असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले तसेच भविष्यात पुनर्विकास न करता इमारत कोसळण्याच्या घटना घडल्यास त्याची जबाबदारी शासन घेणार आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उपरोक्त परिसरातील इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) मुंबई शहर व उपनगरात जानेवारी, २०१५ ते डिसेंबर, २०१९ या कालावधीत इमारत कोसळण्याच्या एकूण १४७२ घटना घडल्या असून, त्यामध्ये १०६ जणांचा मृत्यू व ३४४ जखमी झाले आहेत.

तसेच, सदर प्रकरणी अशी कोणत्याही प्रकारची पुनर्विलोकन समिती बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत स्थापन करण्यात आली नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) कल्याण-डोंबिवली येथील धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासाठी शासनाने योजना राबवावी या मागणीकरीता तेथील रहिवासी सातत्याने आंदोलने करीत असल्याचे दिनांक ११/१२/२०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले नसल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये भाडेकरुव्याप्त अधिकृत इमारतीचे पुनर्वसन करण्याबाबत परिशिष्ट-आर नुसार तरतूद आहे.

सदर परिशिष्टामध्ये नमूद केल्यानुसार, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामधील भाडेकरुव्याप्त अधिकृत असलेल्या धोकादायक इमारतींची पाहणी करुन, समितीने शिफारस केलेल्या इमारतींना परिशिष्ट-आर व विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार पुनर्विकास परवानगी देण्यात येते.

सदर परिशिष्ट-आर मधील तरतुदीनुसार भाडेकरुव्याप्त क्षेत्राच्या मोबदल्यात प्रोत्साहनपर अतिरिक्त चटईक्षेत्रासह २.५ इतक्या महत्तम चटईक्षेत्र मर्यादेत पुनर्वसन/पुनर्विकास याबाबत परवानगी प्रदान करणेबाबत तरतुद नमूद आहे.

(३) कामाठीपुरा येथे सन २०१६ मध्ये म्हाडा प्राधिकरणामार्फत कोणत्याही प्रकारचा समुह पुनर्विकास प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावित करण्यात आले नसल्याचे गृहनिर्माण विभागाने कळविले आहे.

(४) मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास म्हाडा अधिनियम, १९७६ व विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील नियम ३३(७) नुसार करण्यात येतो.

उपकरप्राप्त नसलेल्या मुंबई शहरातील जुन्या इमारतींचा विकास हा विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील नियम ३३(७ए) नुसार करण्यात येतो.

धोकादायक इमारतींच्या दुरुस्तीचे तथा पुनर्बांधणीचे प्रस्ताव विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ नियम ६० नुसार मंजूर करण्यात येतात.

मुंबई शहरातील जुन्या इमारतींचा समूह विकास हा विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील नियम ३३(९) नुसार करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

संगमेश्वर-देवरुख-साखरपा (जि.रत्नागिरी) राज्य मार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

(४७) * ३० श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४०८६२ ला दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर-देवरुख-साखरपा (जि.रत्नागिरी) राज्यमार्ग अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडून पूर्णतः खराब झाला असल्याने मोठ्या प्रमाणावर अपघात होवून मनुष्यहानी व मालमत्तेचे नुकसान होत असल्यामुळे सदरहू राज्य मार्गाचे विनाविलंब मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याचे काम हाती घेण्यात यावे म्हणून परिसरातील ग्रामस्थांनी गत ६ महिन्यापासून सातत्याने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण, उपअभियंता, सा.बां. उपविभाग, देवरुख आदिंकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर राज्य मार्गाचे विनाविलंब मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास रुपये ३२ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून उक्त काम अर्थसंकल्पात समाविष्ट करुन कामाच्या निविदा निश्चित करुन काम हाती घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संगमेश्वर-देवरुख-साखरपा राज्य मार्गाचे काम पूर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) प्रश्नांकित संगमेश्वर-देवरुख-साखरपा रस्ता मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करणेसाठीची मागणीबाबतचे निवेदन प्राप्त आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रश्नांकित काम प्रगतीत असल्याने चौकशी करुन कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

प्रश्नांकित संगमेश्वर-देवरुख-साखरपा हा रस्ता रा.मा.१६६ असून त्याची एकूण लांबी ३२ कि.मी. आहे.

सदर रा.मा.३२ कि.मी. लांबीमध्ये मातीकाम, रुंदीकरण व खडीकरण तसेच ३६ मोऱ्या व एका पूलाचे काम झाले असून रस्त्यावरील खड्डे डांबरमिश्रित खडीने भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

तसेच कि.मी.०/०० ते १५/०० मध्ये एका थराचे डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत प्रगतीत असलेले काम लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

(४८) * १०४७ श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड शहराच्या विकासाकरीता शासनाने सिमेंट रस्ते, भुयारी गटार, सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट, नाले इत्यादीसाठी करोडो रुपयांचा निधी मंजूर केला असून अमृत अटल योजनेंतर्गत भुयारी गटार योजनेच्या संकलन व्यवस्थेचे व मुख्य मलवाहिनीचे काम, मलशुध्दीकरण केंद्र व दोन वेटवेल अशा तीन आवश्यक बाबींकरीता जागा मुख्याधिकाऱ्यांनी उपलब्ध न करुन दिल्यामुळे कार्यकारी अभियंता यांनी कामास स्थगिती दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहारातील कॅनॉल रोड, नवगण कॉलेज ते पालवण चौक, पिंगळे नगर ते पाण्याची टाकी यासह १० पेक्षा अधिक ठिकाणी एसटीपी प्लांटसाठी मुख्याधिकाऱ्यांनी जागा उपलब्ध न करुन दिल्यामुळे भुयारी गटार योजना थांबली असून नागरिकांना खड्डे तसेच धुळीचा सामना करावा लागत असल्यामुळे फुप्फुसाचे, मणक्याचे व विविध प्रकारचे आजार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी शहरातील सर्व कामे आपल्या मर्जीतील ठेकेदारांना दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर दोषी मुख्याधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत रुपये १६५.८० कोटी किंमतीच्या बीड शहर मलनि:स्सारण प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पाची कार्यान्वयन यंत्रणा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण असून त्यांनी या प्रकल्पाचे कार्यादेश दिनांक १८ जुलै, २०१८ रोजी दिले आहेत.

सदर प्रकल्पातील मलशुध्दीकरण केंद्र व वेट वेलच्या जागांच्या उपलब्धतेअभावी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बीड यांनी दिनांक ०२/११/२०१९ च्या पत्रान्वये सदर प्रकल्पाचे काम थांबविण्यात येत असल्याचे बीड नगरपरिषदेस कळविले होते.

परंतु बीड नगरपरिषदेने सदर जागा उपलब्ध करून देत असल्याबाबत कळविल्यानंतर कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बीड यांनी दिनांक २७/१२/२०१९ च्या पत्रान्वये सदर प्रकल्पाचे काम पुन्हा सुरु करण्यात आले असल्याचे बीड नगरपरिषदेस कळविले आहे.

(२) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत बीड शहर मलनि:स्सारण प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत बीड शहरातील रस्ते विकास प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर आहेत.

बीड शहरातील कॅनॉल रोड तसेच पिंगळे नगर ते पाण्याची टाकी या रस्त्याशी संबंधित भुयारी गटाराची कामे असणाऱ्या रस्त्याची लांबी ४६० मीटर आहे व ते काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

नवगण कॉलेज ते पालवण चौक हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून मंजूर आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी १.५ किमी असून त्यापैकी १.२ किमी रस्ता भुयारी गटार योजनेच्या कामात येतो. त्यापैकी ३३० मीटर लांबीचे भुयारी गटार योजनेचे काम पूर्ण करण्यात आलेले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

तसेच शहरातील इतर भुयारी गटाराची कामे जसजशी पूर्ण होतील त्याप्रमाणे त्या त्या क्षेत्रातील रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात येतील.

(३), (४) व (५) बीड नगरपरिषदेमार्फत सर्व कामे ही शासनाच्या विहित कार्यपध्दती व नियमानुसार ई-टेंडरिंगव्दारे दिली असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

याप्रकरणी भुयारी गटार योजनेच्या प्रगतीचा आढावा घेऊन, त्या योजनेतील मलशुध्दीकरण केंद्र (STP) व वेट वेल साठी जागा उपलब्ध करून देण्याच्या सूचना नगरपरिषदेस देण्यात आल्या आहेत.

मौजे केम ते टेंभुर्णी (ता.करमाळा) दरम्यान असलेल्या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

(४९) * २१६९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे केम ते टेंभुर्णी (ता.करमाळा) या दरम्यान असलेल्या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्नांकीत मौजे केम ते टेंभुर्णी यांना जोडणाऱ्या दोन पर्यायी रस्त्यांपैकी केम-दहिवली-कन्हेरगाव टेंभुर्णी प्रजिमा ४ असून या लांबीमध्ये व्दिवार्षिक देखभाल दुरुस्तींतर्गत खड्डे भरण्यात आले असून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. तसेच दुसरा पर्याय केम ते कंदर प्रजिमा १२ व कंदर ते टेंभुर्णी रा.मा.८ या लांबीत विशेष दुरुस्तींतर्गत रस्ता सुस्थितीत ठेवण्यात आला असून दोन्ही रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या ३९ लाचखोर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(५०) * १९१ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयंत पाटील : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या स्थापनेपासून म्हणजेच गत ३६ वर्षात ३९ लाचखोर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महानगरपालिकेमार्फत दोषी आढळून आलेल्या ३५ लाचखोर अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुन्हा नोकरीमध्ये येण्याची संधी देण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने लाचखोर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१), (२) व (३) दिनांक १/१०/१९८३ ते दिनांक ३१/१२/२०१९ या कालावधीत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील एकूण ४० अधिकारी व कर्मचाऱ्यांवर लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत कारवाई झालेली असून, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना महानगरपालिका सेवेतून निलंबित करण्यात आले.

निलंबित केलेल्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांविरूध्द नियमानुसार विभागीय चौकशीची कार्यवाही करून त्यांच्याविरूध्द मा.उच्च न्यायालयात अभियोग दाखल करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

शासन निर्णयातील तरतूदी, निलंबन आढावा समितीच्या शिफारशी तसेच सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार उपरोक्त ४० पैकी ३० अधिकारी/कर्मचारी यांचे निलंबन संपुष्टात आणून त्यांना सेवेत अकार्यकारी पदावर पुन:स्थापित करण्यात आलेले आहे. उर्वरित १० अधिकारी/कर्मचारी सद्या निलंबनाधीन आहेत.

लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत कारवाई झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरूध्द मा.न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार कारवाई करण्याची तजवीज ठेवली असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबरनाथ (जि.ठाणे) येथील प्राचीन शिवमंदिर परिसरात गार्डन आणि मत्स्यालय बांधण्याबाबत

(५१) * १०१७ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील प्राचीन शिवमंदिर परिसरातील महापालिकेच्या गार्डन आणि मत्स्यालयासाठी आरक्षित असलेल्या साडेतीन एकर जागेला संरक्षक भिंत आणि मत्स्यालयासाठी आवश्यक जागेकरीता नगरपरिषदेने दीड कोटी रुपये खर्च करुनही मत्स्यालयाचे बांधकाम झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मत्स्यालयाचे बांधकाम अनेक दिवसांपासून अपूर्णावस्थेत असून मत्स्यालयाच्या खिडकीच्या काचा आणि संरक्षक भिंतीचीही तोडफोड करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी/चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार जबाबदार व्यक्तीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच मत्स्यालय कधीपर्यंत सुरु होण्याचे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) नगरपरिषद विकास आराखड्यानुसार प्राचीन शिवमंदीर परिसरालगत आरक्षण क्र.१७२ खेळाचे मैदान व आरक्षण क्र. १६९ मत्स्यालय यासाठी आरक्षित असलेल्या जागा विकसित करण्याकरीता १४ व्या वित्त आयोगांतर्गत मत्स्यालय इमारत व संरक्षक भिंत (कुंपण भिंत) बांधण्याचे काम करण्यात येत आहे.

सदर कामासाठी रुपये १.५० कोटी इतका निधी १४ व्या वित्त आयोग योजनेतून नगरपरिषदेस प्राप्त झाला आहे.

वित्त आयोग योजनेंतर्गत प्राप्त निधीमधून रुपये ४० लक्ष इतक्या रक्कमेच्या मत्स्यालय इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

तर, उर्वरित निधी मधून एकूण २१० मी. लांबीच्या संरक्षक भिंतीपैकी ९० मी.लांबीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून उर्वरित १२० मी.लांबीचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेतून रुपये १.२४ कोटी इतका निधी नगरपरिषदेस प्राप्त झाला आहे.

सद्य:स्थितीत १२० मी.लांबीची संरक्षक भिंत बांधण्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे अंबरनाथ नगरपरिषदेने कळविले आहे.

(२) व (३) मत्स्यालय इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. मात्र सदर इमारतीच्या शेजारी असलेल्या मोकळ्या मैदानात मुले क्रिकेट व इतर खेळ खेळत असल्याने इमारतीच्या काही काचा फुटल्याची वस्तुस्थिती नगरपरिषदेने कळविली आहे.

संरक्षक भिंतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सदर बाबीस प्रतिबंध होणार आहे.

मत्स्यालय इमारतीमध्ये मत्स्यालय कार्यान्वित करण्याकरीता नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली असून तातडीने मत्स्यालय कार्यान्वित करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे-मुंबई एक्स्प्रेस-वे वरील बोरघाट ते खालापूर या रस्त्यावर "ट्रॉमाकेअर सेंटर" ची सुविधा उपलब्ध करण्याबाबत

(५२) * २२९३ श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-मुंबई एक्स्प्रेस-वे वरील बोरघाट ते खालापूर या रस्त्यावर अपघात होण्याचे प्रमाण वाढले असून उक्त ठिकाणी "ट्रॉमाकेअर सेंटर" ची सुविधा नसल्याने अपघातातील जखमींना प्राथमिक उपचारांसाठी पनवेल येथे जावे लागत असल्याची बाब दिनांक २७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, “गोल्डन अवर्स” मध्ये अपघातातील जखमींना उपचार मिळण्यासाठी बोरघाट ते खालापूर या रस्त्यावर “ट्रॉमा केअर सेंटर” ची सुविधा कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) होय, हे खरे आहे.

(२) पनवेल (कळंबोली) येथे ट्रॉमाकेअर सेंटर असल्याने बोरघाट ते खालापूर या लांबीत सध्या आरोग्य विभागातर्फे ट्रॉमाकेअर सेंटर प्रस्तावित नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील शासकीय वसाहतींची दुरवस्था झाल्याबाबत

(५३) * ८७३ श्री.जयंत पाटील : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा प्रशासनाने सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान धोकादायक इमारतींचा आढावा घेतला असता त्यामध्ये सुमारे १० शासकीय इमारतींचा समावेश करण्यात आला असून अलिबाग येथे सन १८८९ मध्ये बांधण्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या इमारतीची देखभाल व दुरूस्ती सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वेळोवेळी करण्यात न आल्यामुळे इमारतीची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग तालुक्यातील चेंढरे आणि पिंपळभाट येथील शासकीय कर्मचारी वसाहतीतील इमारतींची दुरवस्था झाल्याने त्या ठिकाणी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) हे अंशत: खरे आहे.

रायगड जिल्हा प्रशासनाने सन २०१९ मध्ये घेतलेल्या धोकादायक इमारतींच्या आढाव्यामध्ये १० शासकीय इमारती धोकादायक आढळल्या आहेत. यापैकी ४ इमारती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देखभाल व दुरुस्तीसाठी असून त्यापैकी २ इमारती पोलीस विभागाच्या असून त्यांचे बांधकाम सन १८६७-६८ व १८८३-८४ मध्ये करण्यात आले आहे. सदरील इमारती वास्तव्याकरीता सुरक्षित नसल्याने सद्य:स्थितीत या इमारतींमध्ये कोणीही वास्तव्यास नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

अलिबाग शहरातील चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील शासकीय वसाहतीमध्ये सुमारे १५ इमारती असून या इमारती सन १९७७-७८ मध्ये बांधण्यात आल्या आहेत. सदरील १५ इमारतींपैकी ११ इमारती राहण्यास धोकादायक असून सद्य:स्थितीत त्या विना वापरात आहेत. उर्वरीत ४ इमारती वापरात आहेत.

पिंपळभाट येथील शासकीय वसाहतीमधील २ इमारतींपैकी १ इमारत राहण्यास धोकादायक असून सद्य:स्थितीत विना वापरात आहे. उर्वरीत १ इमारत वापरात आहेत.

(३) चेंढरे येथील शासकीय वसाहतीमधील इमारती पाडून तेथे नव्याने इमारती बांधणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधीसाठी सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्ह्यातील मुरुमवाडा-पंधरामाड-पांढरा समुद्र ते मिऱ्या येथे टेट्रापॉड व ग्रोयनचा धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्याबाबत

(५४) * **८५४ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील मुरुमवाडा-पंधरामाड-पांढरा समुद्र ते मिऱ्या येथे टेट्रापॉड व ग्रोयनचा धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्याकरीता लागणारे अंदाजित १८७.६७ कोटी रकमेस शासनाने दिनांक ६ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टेट्रापॉड व ग्रोयनचा धूपप्रतिबंधक बंधारा बांधणेच्या कामास आजमितीस प्रत्यक्षात सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामास सुरुवात न होण्याची सर्वसाधारण कारणे काय असून टेट्रापॉड व ग्रायनचा धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्याच्या कामास प्रत्यक्षात केव्हापासून सुरुवात होणार आहे व उक्त काम केव्हापर्यंत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) व (२) होय.

(३) सदर कामासाठी मुख्य अभियंता, सा. बा. प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६/०४/२०१९ रोजी सुकाणू समिती गठीत करण्यात आल्यानुसार Terms Of Referance (TOR) ला मंजुरी दिनांक ११/०६/२०१९ रोजी देण्यात आली. सल्लागार नेमणूकीची प्रथम निविदा दिनांक १३/०६/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली. परंतु निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने पुनश्च: निविदा दिनांक १६/०७/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली. प्राप्त न्युनतम निविदा दिनांक १३/०१/२०२० रोजी मंजूर करण्यात आली असून सदर सल्लागारास कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. सदर कामासाठी D.P.R/सागरी किनारा क्षेत्र (CRZ) व इतर विभागाकडून विविध आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्यानंतर काम सुरु करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात "सर्वांसाठी घरे" या अभियानांतर्गत सुरु करण्यात आलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेबाबत

(५५) * ३९५ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने नागरी भागाकरीता सन २०२२ पर्यंत "सर्वांसाठी घरे" या अभियानांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना सुरु केलेली असून दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजनेचा अंगिकार शासनाने केलेला असून या योजनेत सन २०२२ पर्यंत राज्यात १९ लाख ४० हजार घर निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे व त्यानुसार केंद्र शासनाने राज्यातील ३८३ शहरांमध्ये योजना राबविण्यास मंजूरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आवास योजनेंतर्गत माहे नोव्हेंबर, २०१९ पर्यंत प्रत्यक्षात सुमारे ३४,००० घरे तयार असून सुमारे ११ लाख ४० हजार घरांच्या प्रकल्पांना मंजूरी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेची एवढया संथगतीने अंमलबजावणी करण्याची कारणे काय आहेत तसेच या योजनेंतर्गत बांधावयाच्या घरांचे उद्दिष्ट विहित मुदतीत पूर्ण करणे शक्य व्हावे याकरीता कोणते विशेष प्रयत्न करण्यात आले वा येत आहेत व अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जितेंद्र आव्हाड : (१) केंद्र पुरस्कृत "सर्वांसाठी घरे" या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याकरीता दिनांक ०९/१२/२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर योजनेंतर्गत सन २०२२ पर्यंत राज्याने १९.४० लक्ष घरकुल निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. सद्य:स्थितीत राज्यातील ३९१ स्थानिक नागरी स्वराज्य संस्था व नियोजन प्राधिकरणांमध्ये योजना राबविण्यात येत आहे.

(२) व (३) माहे नोव्हेंबर, २०१९ पर्यंत केंद्रीय मान्यता व सनियंत्रण समितीने राज्यातील ९५९ प्रकल्पातील ११,६१,२७४ घरकुलांना (९,७८,५७९ EWS) घरकुलांना व योजनेच्या घटक क्र.२-CLSS अंतर्गत १,७४,६६७ घरकुलांना अशा एकूण १३,३५,९४१ घरकुलांना मंजूरी दिली आहे.

सद्य:स्थितीत माहे जानेवारी, २०२० पर्यंत केंद्रीय मान्यता व सनियंत्रण समितीने राज्यातील १००८ प्रकल्पांतील ११,७४,५९१ घरकुलांना (९,९१,९३६ EWS) घरकुलांना व योजनेच्या घटक क्र.२-CLSS अंतर्गत १,८४,२१३ घरकुलांना अशा एकूण १३,५८,८०४ घरकुलांना मंजूरी दिली आहे. त्यापैकी माहे जानेवारी, २०२० पर्यंत १,९१,९९८ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून २,०१,६११ घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाने पुढीलप्रमाणे उपाययोजना केलेल्या आहेत :-

१) शासकीय जमिनी रुपये १/- प्रती चौ.मी. या नाममात्र दराने अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना या योजनेंतर्गत वाटप करण्यात येणाऱ्या सदनिकेसाठी केवळ पहिल्या दस्ताला मुद्रांक शुल्कातून सवलत देण्यात आली असून ते रुपये १०००/- इतके निश्चित करण्यात आले आहे.

३) मोजणी शुल्कात ५०% सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

४) या योजनेंतर्गत सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तत्वावरील प्रतिकृतींची राज्यात अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कांदिवली (मुंबई) येथील कांदळवनात डेब्रिज व कचऱ्याचे साम्राज्य पसरल्याबाबत

(५६) * ९७१ श्री.रामदास कदम, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्रीमती स्मिता वाघ, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली पश्चिम येथील चारकोप सेक्टर ८ मधील कांदळवनात डेब्रिज व कचरा यांनी भरलेल्या ट्रकमधून रात्रीच्या अंधारात कचरा टाकले जात असल्यामुळे उक्त परिसरात कचऱ्याचे साम्राज्य पसरल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कचरा आणि डेब्रिजच्या समस्येबाबत महापालिकेच्या आर/मध्य विभागाकडे वारंवार पत्रव्यवहार करूनसुध्दा महापालिकेकडून कोणतीही कारवाई करण्यात न आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये सर्वस्तरावरील अधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीत कांदळवनाचा भाग हा त्वरीत कांदळवन विभागाकडे हस्तांतरीत करावा अशा सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच महानगरपालिका व कांदळवन विभागाने कांदळवनाचे जतन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) "कांदिवली चारकोप सेक्टर आठ येथील कांदळवनात डेब्रिज व कचऱ्याचे साम्राज्य" अशा आशयाची बातमी दिनांक २ जानेवारी, २०२० रोजीच्या लोकमत या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर ठिकाणी पडलेला कचरा व डेब्रिज उचलण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

याबाबतची बातमी दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजीच्या "लोकमत" या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

(३) याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक ०१/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये कांदिवली (प.), चारकोप, सेक्टर ८ अंतर्गत कांदळवन क्षेत्रात मोडणारा भूभाग म्हाडा प्राधिकरणामार्फत कांदळवन संधारण घटक (Mangrove cell) यांच्याकडे तातडीने हस्तांतरीत करण्यात यावा असे कळविले आहे.

सदर प्रकरणी म्हाडा प्राधिकरणातर्फे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असेल गृहनिर्माण विभागाने कळविले आहे.

(४) सदर क्षेत्रात कचरा व डेब्रिज टाकण्याचे प्रकार घडू नयेत यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत क्लिन-अप मार्शलची गस्त वाढविण्यात आली आहे.

तसेच, महानगरपालिकेच्या "डेब्रिज ऑन कॉल" या योजनेबाबत जनजागृती करण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला शहरातील जठारपेठ भागाला रेल्वे गेटवरुन न्यु तापडिया नगराला जोडणाऱ्या उड्डाण पुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(५७) * ९३४ श्री.गोपिकिशन बाजोरीया, डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील जठारपेठ भागाला रेल्वे गेटवरुन न्यु तापडिया नगराला जोडणाऱ्या उड्डाण पुलाकरीता शासनाने निधी मंजूर करुन तसेच निविदा प्रसिध्द करुनही उड्डाणपुलाचे कामास सुरुवात झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाण पुलाचे काम करताना येथील स्थानिक रहिवाश्यांना विश्वासात घेण्यात आलेले नसून उक्त उड्डाण पुल हा रेल्वे गेटच्या वरुन जात असल्यामुळे या कामाकरीता आरबीओची परवानगी देखील घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर पुलाच्या कामाची कालमर्यादा निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) व (२) हे खरे नाही.

सदर कामास केंद्रिय मार्ग निधी अंतर्गत मंजुरी मिळाली आहे. तद्नंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक १३/१२/२०१८ रोजी मे.शारदा कंस्ट्रक्शन प्रा.लि., नांदेड या कंत्राटदारास देण्यात आले आहेत.

सदर कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर रेल्वे उड्डाण पुलाच्या सर्वसाधारण आराखड्यास रेल्वे प्रशासनाकडून दिनांक ०९/०३/२०१८ रोजी मंजुरी देण्यात आली.

तद्नंतर स्थानिक अकोला महानगरपालिका प्रशासनाकडून त्यांचे पत्र दिनांक ३१/१२/२०१८ अन्वये सातव चौक ते रेल्वे गेट ३० मीटर रस्ता रुंदीनुसार रेल्वे उड्डाण पुलाची आखणी करण्याची परवानगी देण्यात आली व त्यानुसार सदर कामास सुरुवात करण्यात आली. सद्य:स्थितीत काम प्रगती पथावर आहे.

(३) व (४) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

कामाच्या मूळ मुदतीत म्हणजेच दिनांक १२/१२/२०२० पर्यंत सदर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

माझगांव, मुंबई येथील हँकॉक पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबत

(५८) * १५९८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगाव, मुंबई येथील बहुचर्चित हँकॉक पुलाची पुनर्बांधणी गत दोन वर्षापासून प्रलंबित असल्यामुळे उक्त परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची पुनर्बांधणी प्रलंबित असण्याची कारणे काय असून उक्त पुलाची पुनर्बांधणी त्वरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील डोंगरी भागातून माझगांव भागात जाण्याकरीता रेल्वेवरील हँकॉक पुलाचा वापर करण्यात येत होता. सदर पूल धोकादायक अवस्थेत असल्यामुळे माहे जानेवारी, २०१६ मध्ये रेल्वे प्रशासनामार्फत निष्कासित करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत सदर भागातील वाहतुकीसाठी हँकॉक पुलापासून साधारणत: २०० मीटर अंतरावर सरदार वल्लभभाई पटेल पूल व ओलिवंट पूल हे मार्ग उपलब्ध आहेत.

(२) व (३) सदर पुलाची पुनर्बांधणी करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निविदा काढून दिनांक १२/०२/२०१८ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रेल्वे प्रशासनाच्या जागेवरील झोपड्यांचे निष्कासन माहे एप्रिल, २०१९ मध्ये करण्यात आले असून, रेल्वे हद्दीतील दोन्ही बाजूचे पायाभरणीचे काम पूर्ण झाले आहे.

सदर पुलाचे उर्वरित काम माहे सप्टेंबर, २०२० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

मुंबईत आग लागण्याच्या घटना घडल्याबाबत

(५९) * ११८१ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत गत ३ वर्षाच्या तुलनेत सन २०१९ मध्ये सर्वाधिक म्हणजेच ५,४२७ आग लागण्याच्या घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आगीच्या घटनेपैकी १७ आगी गंभीर स्वरुपाच्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आगीच्या घटनांवर आळा बसण्याकरीता तसेच मुंबईत अग्निशमन नियमावलीची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) व (२) हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलामार्फत आगींची चौकशी केली असता बहुतांश आगी "सदोष विद्युत प्रणाली" मुळे लागल्याचे आढळून आले आहे.

सदोष विजेच्या जोडणी/तारांमुळे उद्भवणाऱ्या घटनांना आळा घालण्यासाठी वीज पुरवठा करणाऱ्या संस्था/कंपनींना, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन संस्था, मुंबई उपनगर यांचेमार्फत नोटीस देण्यात आल्या आहेत.

तसेच अग्निसुरक्षा यंत्रणा सुस्थितीत नसलेल्या इमारतींचे मालक/भोगवटादार यांच्यावर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये कारवाई करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

(६०) * १२२ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.विलास पोतनीस, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४४४१० ला दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील अनेक झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प विकासकाच्या अनागोंदी कारभारामुळे वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवदुर्गा सहकारी संस्था अंधेरी, इंदिरानगर एस.आर.ए. जोगेश्वरी, खोत डोंगरी सहकारी संस्था, मालाड, शिवनगर लोकनायक नगर, न्युकपासवाडी, शितलादेवी सहकारी संस्था अंधेरी, गणेशवाडी सहकारी संस्था अंधेरी या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील पात्र झोपडीधारकांची दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी मुख्याधिकारी यांच्यासोबत झालेल्या बैठकीत संबंधित प्रकल्पाच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(३) तसेच, सदर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात बनावट व अपात्र झोपडीधारकांना सदनिका मिळाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बनावट व अपात्र झोपडीधारकांवर संबंधित झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कारवाई करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील पात्र झोपडीधारकांना सदनिका मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जितेंद्र आव्हाड : (१) हे खरे नाही.

(२) अंधेरी येथील नवदुर्गा सहकारी गृहनिर्माण संस्थेची निवडणूक प्रक्रिया प्रलंबित असून अशा संस्थांच्या निवडणुका घेण्याकरीता नियमावली बनविण्याचे काम सुरु आहे. तोपर्यंत सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेस स्थगिती देण्यात आली आहे. इंदिरानगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अंमलबजावणीमध्ये विकासकाने हलगर्जीपणा केल्यामुळे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १३(२) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक ३०/०६/२०१७ रोजी संबंधित विकासकाची नियुक्ती रद्द केली असून संस्थेस नवीन विकासक नियुक्त करण्याची मुभा दिली आहे. मालाड येथील खोतडोंगरी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या विकासकास उपस्थित मुद्दयांच्या अनुषंगाने खुलासा करण्याची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक १५/०१/२०२० रोजी नोटीस दिली असून याबाबत पुढील कार्यवाही प्राधिकरणामध्ये सुरु आहे. लोकनायक नगर, शिवाजी नगर व कपासपाडी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या विकासकाने हलगर्जीपणा केल्यामुळे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १३(२) अन्वये संबंधित झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विकासकाची नियुक्ती रद्द केली आहे. प्राधिकरणाच्या सदर कार्यवाहीस विकासकाने मा.उच्च न्यायालयात आव्हान दिले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. शितलादेवी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत विकासकाने हलगर्जीपणा केल्यामुळे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १३(२) अंतर्गत प्राधिकरणामध्ये सुनावणीची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पिंगळी ते ताडकळस (ता.परभणी) रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या कामाकरीता वृक्षतोड करण्यात आल्याबाबत

(६१) * १६६९ श्री.विप्लव बाजोरिया : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंगळी ते ताडकळस (ता.परभणी) रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या कामाकरीता मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात येत असून रुंदीकरणाच्या कामामध्ये न येणाऱ्या झाडांची देखील कंत्राटदाराकडून कत्तल करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तोडलेली झाडे गायब करण्यात आली असून रस्त्याचे कामही बंद करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्यांच्या कामासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) हे खरे नाही. वन विभागाची नियमानुसार परवानगी घेऊनच रूंदीकरणाच्या कामातील वृक्षतोड करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वसई-विरार महानगरपालिकेचे लाखो रुपयांचे साहित्य विनावापर असल्याबाबत

(६२) * २१५१ श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण आणि दिवाबत्ती विभागाचे लाखो रुपयांचे साहित्य पेल्हार येथील जलशुध्दीकरण केंद्राच्या आवारात विनावापर भंगारात पडून असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार महानगरपालिका प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे लाखो रुपयांचा आर्थिक फटका बसल्याप्रकरणी निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी वसई तालुक्यातील एका राजकीय पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्याने दिनांक ०६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास एका सविस्तर लेखी निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) हे खरे नाही.

पेल्हार येथील जलशुध्दीकरण केंद्राच्या आवारात प्रभाग समिती-एफ, पेल्हार विद्युत विभागाचे बंदीस्त वर्कशॉप व गोडाऊन आहे. तसेच त्याच ठिकाणी प्रभाग समितीतील सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थेची दैनंदिन दुरुस्ती/आवश्यक विद्युत साहित्यांचा साठा ठेवण्यात येतो. तसेच सदर आवारात प्रभागातील पुनर्वापर करण्यात येणाऱ्या वृक्षप्राधिकरणाच्या ट्री-गार्डचा साठा देखील करण्यात येत असल्याची वस्तुस्थिती वसई-विरार महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) व (३) अशा प्रकारची तक्रार शासनाकडे प्राप्त झाली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने तात्काळ नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांना दिनांक ०३/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी स्मारकाच्या बांधकामाबाबत

(६३) * २१२४ श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक ४७९५८ ला दिनांक २६ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी स्मारकासाठी यशवंत स्टेडियम परिसरातील महानगरपालिकेने प्रस्तावित केलेली २७८० चौ.मी. जागा स्मारकाला अपूरी पडत असल्याने महानगरपालिकेने खसरा क्र. ५/३, ६/७ मधील १३.५६ एकर संपूर्ण जागेचा ठराव दिनांक २ जुलै, २०१८ रोजी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण बैठकीत "विशेष बाब" म्हणून मंजूर करून शासनाकडे मंजूरीकरीता पाठविला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम गत २६ वर्षापासून प्रलंबित असून यासंदर्भात यापूर्वी विविध राजकीय पक्षांनी, संघटनांनी लोकशाही मार्गाने आंदोलने केली असून विधानभवन, मुंबई येथे तत्कालीन महसूल मंत्री एकनाथ खडसे यांनी बोलाविलेल्या बैठकीत प्रधान सचिव, नगरविकास व महसूल विभाग, विभागीय आयुक्त, नागपूर, मनपा आयुक्त, नागपूर व उपजिल्हाधिकारी, नागपूर यांनी दिनांक १४ एप्रिल, २०१६ पूर्वी जागेचा आराखडा व नकाशा मंजूर करुन त्याचे हस्तांतरण महानगरपालिकेकडे करण्याचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यशवंत स्टेडीयम परिसरात असलेला स्टार बस डेपो मोरभवन येथे स्थलांतरीत करुन बांधकामास आवश्यक निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्याचे आदेशही तत्कालीन महसूल मंत्री यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) नागपूर महानगरपालिकेने "डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी स्मारकाकरीता यशवंत स्टेडीयम जवळील संपूर्ण १३.५६ एकर शासकीय जमीन विनाअट महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात यावी, असा दिनांक ०२/०७/२०१८ रोजी ठराव पारित केला असून, त्यानुसार दिनांक २०/११/२०१८ च्या पत्रान्वये आवश्यक तो प्रस्ताव महसूल व वन विभागास सादर केलेला आहे.

(२), (३), (४), व (५) या विषयासंदर्भात तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२/०४/२०१६ रोजी बैठक संपन्न झाली होती.

तद्नंतर, तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत दिलेल्या निदेशानुसार, विषयाधीन जागेचा एकत्रित आराखडा नागपूर महानगरपालिकेकडून तयार करण्यात आलेला आहे.

या आराखड्यातील फेरबदलाच्या अनुषंगाने, दिनांक १७/०९/२०१९ अधिसूचना प्रसिध्द करुन, दिनांक १८/०९/२०१९ च्या वर्तमानपत्राव्दारे जाहीर हरकती/सूचना मागविण्यात आल्या होत्या.

तद्नुसार प्राप्त झालेल्या ४९ हरकती/सूचनावर दिनांक ०३/०१/२०२० व दिनांक ०४/०१/२०२० रोजी सुनावणी पूर्ण झालेली आहे.

तथापि, यासंदर्भात, मा.उच्च न्यायालयात दाखल असलेल्या जनहित याचिका क्र.८/२०१० च्या अनुषंगाने तपासणी करुन, पुढील अहवाल शासनास सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे, नागपूर महानगरपालिकेच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

नागपूर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध थकबाकीबाबत

(६४) * १८०६ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेतील आठ हजार शिक्षक व कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी योजना, अंशदान पेन्शन, महागाई भत्ता आणि वेतन आयोग अशी जवळपास ५२७ कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त विविध थकबाकी मिळण्याकरीता कर्मचारी संघटनेतर्फे वेळोवेळी आंदोलन केले असता शासनाने आश्वासन देऊन ही आश्वासनाची अद्याप पुर्तता केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) नागपूर महानगरपालिकेच्या कार्यरत व सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची खालीलप्रमाणे थकबाकी देय आहे.:-

- भविष्य निर्वाह निधी रक्कम रुपये ५१.५२ कोटी
- अंशदान पेंशन रक्कम रुपये २४.७०
- महागाई भत्ता थकित रक्कम रुपये २६.३०
- एकूण थकबाकी रुपये १०२.५२
- नागपूर महानगरपालिकेस ७ वा वेतन आयोग अद्याप प्रत्यक्षात लागू झालेला नाही.

(२), (३) व (४) आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालानुसार, थकबाकीच्या रकमा मिळण्यासंदर्भात कर्मचारी संघटनांकडून वेळोवेळी आंदोलने करण्यात आली आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

महानगरपालिका मंजूर ठरावान्वये दिनांक ०१/१२/२०१० पासून सहावा वेतन आयोग लागू करण्यात आलेला असून, तत्पूर्वीची कोणतीही थकबाकी अनुज्ञेय असणार नाही असा निर्णय झालेला आहे.

तथापि, भविष्य निवार्ह निधी, अंशदायी निवृत्तीवेतन, थकीत महागाई भत्ता प्रदान करण्यासंदर्भात आश्वासित करण्यात आलेले आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी कर्मचारी यांना महानगरपालिका मंजूर ठराव दिनांक २८/०६/२०१९ अन्वये दिनांक ०१/०८/२०१९ पासून ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्या असून, शासनाच्या मान्यतेनंतर, यावर महापालिकेकडून कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

राज्यात शासकीय नोकर भरतीकरीता राबविण्यात आलेल्या महापोर्टल आज्ञावली प्रक्रियेमध्ये अनेक त्रुटी असल्याबाबत

(६५) * ५५५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप, श्री.प्रकाश गजभिये, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अनिल भोसले : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय नोकर भरतीत पारदर्शकता यावी व सर्व प्रक्रिया ऑनलाईन व्हावी म्हणून शासनाने महाआयटीतर्फे संगणकीय प्रक्रियेचे महापोर्टल आज्ञावलीव्दारे घेण्यात आलेल्या परिक्षार्थी उमेदवारांच्या भरती अंतर्गत झालेला परिक्षेचा गोंधळ, चुकीची प्रश्नपत्रिका, सदोष निकाल, उत्तरपत्रिकेतील त्रुटी, अनुपस्थित उमेदवारांचे नावे अंतिम यादीत येणे इत्यादी अनेक तक्रारी परिक्षार्थी उमेदवारांमार्फत शासनाकडे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी “त्रयस्थ संस्थेमार्फत पोर्टलचे तांत्रिक परिक्षण करुन त्यांचेकडून प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे आवश्यक ते बदल करण्यात येतील” असे मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास घोषित करुन महापोर्टलव्दारे होणाऱ्या विविध प्रवर्गातील भरती प्रक्रियेस स्थगिती दिल्याने नवीन स्वरूपात भरती प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही झाली नसल्याचेही निदर्शनास आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विविध विभागातील प्रवर्गातील भरती प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून करण्यात यावी अशा प्रकारची मागणी विविध लोकप्रतिनिधींमार्फत शासनास करण्यात आली असून सदर भरती प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या धरतीवर घेण्याचे शासनाचे नियोजन आहे काय, तसेच सदर भरती प्रक्रिया राबविताना कोणकोणत्या प्रक्रियेव्दारे ती राबविण्यात येणार आहे याबाबतची सविस्तर माहिती काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे : (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

पदांकरीता परीक्षा शक्यतो एकावेळी घेण्यात येण्याच्यादृष्टीने परीक्षा पध्दती सर्व समावेशक बनविण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) महापरीक्षा पोर्टल अंतर्गत घेण्यात येणाऱ्या परीक्षा पध्दतीत आवश्यक बदल करुन सुधारीत कार्यपध्दतीबाबत दिनांक २०/०२/२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अंजनवेल-रानवी-शृंगारतळी-आंबलोली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) राज्य मार्गाची व पूलाची दुरवस्था झाल्याबाबत

(६६) * २२३५ डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनवेल-रानवी-शृंगारतळी-आंबलोली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) या प्रमुख राज्य मार्गाची व पूलाची अत्यंत दुरवस्था झालेली असून सदर रस्त्याचे डांबरीकरण, रस्त्याच्या बाजूची झाडी आणि संरक्षक कठडा बांधण्याबाबत

कोतळूक ग्रामपंचायतीने सातत्याने गत एक वर्षापासून मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री व कार्यकारी अभियंता, सां.बा.विभाग, चिपळूण आदीकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यासाठी निधी मंजूर होऊन कामासाठी नियुक्ती केलेल्या ठेकेदाराने माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान गटाराचे केलेले काम अपूर्ण अवस्थेत असून रस्त्यावर जागोजागी एक ते दीड फुटाचे मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ग्रामस्थांनी माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये उपोषणही केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे व डांबरीकरणाचे कामास सुरुवात न झाल्यामुळे दिनांक २६ जानेवारी, २०२० रोजी ग्रामस्थांनी पुन्हा उपोषण करण्याचा इशाराही दिला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रस्त्याचे मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरणाचे काम विनाविलंब पूर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) प्रश्नाधीन अंजनवेल-रानवी-श्रृंगारतळी-आबलोली रा.मा.१७३ या रस्त्याच्या खराब लांबीत दुरुस्ती व मजबूतीकरणाचे काम सुरु करण्याबाबत कोतळूक ग्रामपंचायतीचे निवेदन प्राप्त नाही.

तथापि, यासंदर्भात विद्यमान ग्रामपंचायत सदस्य श्री.सचिन ओक, कोतळूक यांचे दिनांक ११/११/२०१९ चे निवेदन प्राप्त आहे.

(२) हे खरे नाही.

रस्त्याच्या दुरुस्तीसाठी माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये ग्रामस्थ उपोषण करणार होते, तथापि, प्रश्नांकित रस्त्याच्या लांबीतील खड्डे भरण्यात आले, रस्त्याच्या बाजूची झाडी व संरक्षक कठड्यांची दुरुस्ती करुन रस्ता वाहतुकीस योग्य करण्यात आला त्यामुळे ग्रामस्थांनी उपोषण केले नाही.

(३) होय.

तथापि, सदर रस्त्याचे मजबुतीकरणाचे व डांबरीकरणाचे काम दिनांक ३०/०१/२०२० पासून सुरु करणार असल्याचे कळविण्यात आल्यामुळे उपोषण मागे घेण्यात आले.

(४) प्रश्नांकित रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी खडी गोळा करण्यात आली असून सदर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याचे काम मार्च, २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिकेने राबविलेल्या "मोहल्ला क्लिनिक" योजनेबाबत

(६७) * १४५५ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अरुणकाका जगताप, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेने दिल्ली येथील "मोहल्ला क्लिनिक" योजनेच्या धर्तीवर महानगरपालिका क्षेत्रात प्रायोगिक तत्वावर दोन ठिकाणी दवाखाने सुरु करुन त्यासाठी १६० कोटी रुपयांचा प्रस्ताव देखील मंजूर केल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दवाखान्याची अतिशय दुरवस्था झाली असून तेथे औषधांचा तुटवडा, ऑनलाईन कॉलिंग मशीन दोन महिन्यांपासून बंद, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे तसेच डॉक्टर्स रुग्णांना बाहेरुन औषधे आणण्यास सांगत असल्याच्या तक्रारी रुग्णांनी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना अधिक सक्षम होण्यासाठी १६० कोटींची तरतूद फलदायी ठरु शकेल काय याबाबत आढावा घेण्यात आला आहे काय व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात "मोहल्ला क्लिनिक" योजनेच्या धर्तीवर प्रायोगिक तत्वावर ठाणे महानगरपालिकेने "आपला दवाखाना" नावाने दोन दवाखाने सुरू केले होते. ठाणे महानगरपालिकेने सदर दवाखाने माहे फेब्रुवारी, २०१९ ते एप्रिल, २०१९ दरम्यान विना तक्रारी चालविले होते.

ठाणे महानगरपालिकेने प्रायोगिक तत्वावर सुरू केलेल्या "आपला दवाखाना" योजनेस मिळालेल्या प्रचंड प्रतिसादाचा विचार करता, ठाणे महानगरपालिकेने सदर योजना ५० ठिकाणी सुरू करण्याच्या निर्णय घेतला.

ठाणे महानगरपालिकेने "आपला दवाखाना" या योजनेसाठी रुपये १४४ कोटी ५९ लाख इतकी वित्तीय तरतुद केली आहे.

सदर योजनेचे दिनांक ०६/०२/२०२० रोजी उद्घाटन करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील महापालिकेच्या प्रमुख रुग्णालयामध्ये अनेक औषधांचा तुटवडा असल्याबाबत

(६८) * १५३५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुजितसिंह ठाकूर : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महापालिकेच्या प्रमुख रुग्णालयामध्ये मधुमेह, रक्तदाब तसेच इतर अनेक औषधांचा तुटवडा असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खात्याच्या (सीपीडी) समन्वयाच्या अभावामुळे औषध कंपन्यासोबतचा करार माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये संपूनही नविन निविदा प्रक्रिया प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून व तद्नुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) "पालिका रुग्णालये, दवाखान्यांमध्ये मधुमेहावरील औषधांचा तुटवडा" अशा आशयाची बातमी दिनांक २३/०१/२०२० रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयामध्ये मधुमेह व रक्तादाबावरील इंजेक्शन्स मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, महानगरपालिकेच्या रुग्णालयांना टॅबलेट्स व कॅपस्युल्सचा पुरवठा करणाऱ्या औषध कंपन्यांसोबतचा करार दिनांक २६/०९/२०१९ रोजी संपुष्टात आला होता. परंतु नवीन पुरवठादारांची नेमणूक होईपर्यंत रुग्णालयामध्ये गैरसोय होऊ नये म्हणून जुन्या दरपत्रिकेप्रमाणे टॅबलेट्स व कॅपस्युल्सचा साठा करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत प्रमुख रुग्णालयांना कळविण्यात आले होते. त्यामुळे प्रमुख रुग्णालयामध्ये टॅबलेट्स व कॅपस्युल्सचा तुटवडा झाला नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

सद्य:स्थितीत टॅबलेट्स व कॅपस्युल्सचा पुरवठा करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत दिनांक ३०/०१/२०२० रोजी नवीन करार करण्यात आला असून सर्व रुग्णालयांमध्ये औषध साठा उपलब्ध करुन देण्यात आला असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील मुंबई व इतर शहरातील प्रमुख टोलनाक्यावर वाहतुकीची कोंडी होत असल्याबाबत

(६९) * ४९६ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रमुख टोल नाक्यावर विशेषत: मुंबईच्या प्रवेशव्दारावर असलेला ऐरोली टोलनाका, पूर्व द्रुतगती महामार्गावरील मुंबई आणि ठाण्याचे प्रवेशव्दार असलेला आनंदनगर टोलनाका, मुंबई-अहमदनगर महामार्गावरील पश्चिम उपनगरातील दहिसर टोलनाका, नवी मुंबईतील वाशी टोलनाका व इतरही शहरातील प्रमुख टोलनाक्यावर सकाळ व संध्याकाळी वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टोलनाक्याच्या दोन्ही बाजूस असलेले खड्डे तसेच उड्डाणपूलांच्या अरुंद मार्गिकेमुळे वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) पथकर नाक्यावर होणारी वाहतूकीची कोंडी सोडविण्याकरीता पथकर नाक्यावर सुनियोजितपणे आखणी करुन अतिरिक्त मार्गिका उपलब्ध केलेल्या आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मुंबई महानगरपालिकेस बंद झालेल्या जकात नाक्यांची जागा मिळण्यास्तव विनंती केली असून, जागा उपलब्ध झाल्यास मार्गिकांची संख्या २६ ते २८ होऊन वाहनांची गर्दी टाळण्यात मदत होईल.

पथकर नाक्यांवर पथकर वसूलीकरीता जास्तीत जास्त हॅण्ड हेल्ड मशीन वापरण्यात येत आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

साटवलीफाटा ते कोत्रेवाडी, नावलादेवी मंदिर (ता.लांजा, जि.रत्नागिरी) या रस्त्याच्या कामाबाबत

(७०) * ६५ श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साटवलीफाटा ते कोत्रेवाडी, नावलादेवी मंदिर (ता.लांजा, जि.रत्नागिरी) या सुमारे ३ १/२ कि.मी. अंतराच्या रस्त्याची दुरवस्था झाली असून ठिकठिकाणी खड्डे पडल्यामुळे अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामासाठी निधी मंजूर होवून निविदा निघून दोन महिन्यांचा कालावधी झाला असला तरी कामास सुरुवात करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर काम सुरु करण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) तसेच, लांजा साटवलीफाटा हा रहदारीचा रस्ता असून या रस्त्यावर कोंड्ये, खावडी, सडवली, बाबरे, इसनली, रुण, साटवली, गोळवशी आदी अनेक गावे येत असल्याने या राज्य मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरु असल्यामुळे सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणाचे काम विनाविलंब हाती घेवून पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्नांकित लांबीतील खड्डे भरण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

सदर लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम मंजूर असून काम मे, २०२० अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

मे.आदित्य ॲडव्हटायझिंगने मीरा-भाईंदर महानगरपालिकेची कोट्यवधीची रक्कम थकविल्याबाबत

(७१) * २१७७ श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा-भाइर्दर महानगरपालिकेने सार्वजनिक जागी होर्डिंग आणि त्यावर जाहिराती करण्यासाठी मे.आदित्य ॲडव्हटायझिंगला १२० होर्डिंग ठेक्याने दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठेकेदाराने महानगरपालिकेचे तब्बल २४ कोटी ४० लाख रुपये थकविल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर ठेकेदाराकडून थकबाकी वसुल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेने मे.आदित्य ॲडव्हटायझिंग यांना एकूण १३० होर्डिंग ठेक्याने दिलेल्या असून त्यांनी प्रत्यक्षात ९० होर्डिंग उभारले आहेत.
(२) मे.आदित्य ॲडव्हटायझिंग यांची सन २०१९-२०२० पर्यंत रुपये १,६२,००,९०१/- इतकी जाहिरात फी बाकी होती. त्यापैकी त्यांनी रुपये १,३९,२०,४०१/- भरणा केली असून रुपये २२,८०,५००/- थकबाकी आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(३) मे.आदित्य ॲडव्हटायझिंग यांना थकीत जाहिरात फी वसुलीबाबत नोटीस देण्यात आली होती. तथापि, प्रतिसाद न दिल्याने त्यांच्या ८ होर्डिंगवर तोडक कारवाई करण्यात आलेली आहे. उर्वरित होर्डिंगवर कारवाई प्रस्तावित करण्यात येणार असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मा.अग्यार समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(७२) * ११० श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेली जनहित याचिका क्रमांक १०/२००४ वरील सुनावणीनंतर निर्णय देताना कल्याण-डोंबिवली महानगरपालिकाक्षेत्रातील अनधिकृत बांधकामासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार निवृत्त न्यायमूर्ती श्री.के.एस.अग्यार यांच्या अध्यक्षेतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने दिनांक २४ ऑगस्ट, २००९ रोजी सादर केलेल्या अहवालातील शिफारशींना शासनाने मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालात समितीने ११ जिल्हाधिकारी, १० आयुक्त, वनाधिकारी आणि कल्याण-डोंबिवली मनपातील संबंधित अधिकारी, नगरसेवक, वास्तुविशारद, बिल्डर्स, डेव्हलपर्स, आर्किटेक्ट, इंजिनियर यांच्याविरुध्द नोटीस देऊन पुढील कारवाई करावी असे नगरविकास विभागाचे पत्र क्र. टीपीएस-१२१५/प्र.क्र.४१/१५/नवि-१२, दिनांक २ जुलै, २०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले असतानाही महानगरपालिकेच्या अधिकारी व संबंधित दोषीं विरोधात कोणतीही कारवाई न करता त्यांना संरक्षण देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) होय.

(२) व (३) मा.अग्यार समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करणेसाठी शासनाच्या विविध विभागास/कार्यालयास कळविण्यात आले आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने त्यांचे कार्यक्षेत्रातील ५१ अधिकारी/पदाधिकारी व आर्किटेक्ट यांना कारणे दाखवा नोटीस दिलेल्या आहेत. तसेच काही नोटीस परत आल्याने दैनिक वर्तमानपत्रात सूचना देऊन संबंधित अधिकारी/पदाधिकारी यांना खुलासा सादर करण्यास कळविले आहे. त्यानुषंगाने बहुसंख्य अधिकारी/ कर्मचारी यांनी नोटीसचा खुलासा सादर करणेसाठी प्रकरणातील कागदपत्रे, समितीच्या अहवालाची प्रत मिळणेबाबत महानगरपालिकेकडे विनंती केली असून त्यानुषंगाने महानगरपालिकेचेस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई-नाशिक महामार्गाची तात्काळ दुरुस्ती करणेबाबत

(७३) * ७८० श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नाशिक महामार्गावर अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले असून सदर महामार्गाच्या दुरवस्थेमुळे गत अकरा महिन्यात १०९ अपघात होवून ५३ जणांचे बळी गेल्यामुळे वाहन चालकांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उक्त महामार्गाची तात्काळ दुरुस्ती करणेबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) अंशत: खरे आहे.

(२) मुंबई-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र.३ रस्ता केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे.

सदर महामार्गावरील बहुतांशी अपघात हे प्रामुख्याने मानवी चुका आणि अतिवेगामुळे झाल्याचे आढळते, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.

सदर महामार्गातील ठाणे ते वडपे येथील सुमारे २४ कि.मी. लांबीतील १४ अपघातप्रवण स्थळांची सद्य:स्थितीत तात्पुरती उपाययोजना करण्यात आली असून कायमस्वरुपी उपाययोजना केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आलेल्या आठपदरीकरणाच्या प्रकल्पांतर्गत करण्याचे नियोजन आहे.

तसेच वडपे ते नाशिक या सुमारे १३० कि.मी. लांबीतील अपघातप्रवण स्थळांच्या अभ्यासासाठी सल्लागार नियुक्त करुन त्यांच्या अहवालानुसार आणि आय.आय.टी. मुंबई यांचेकडून प्राप्त करुन घेण्यात आलेल्या रस्ता सुरक्षा अहवालानुसार Flyovers/Underpasse/Sevice Road/VUP/FOB अश्या विविध स्वरुपाच्या उपाययोजना हाती घेण्याच्यादृष्टीने केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत कार्यवाही हाती घेण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बिरवाडी शहर (ता.महाड, जि.रायगड) येथील म्हाप्रळ-पंढरपूर-खरवली पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

(७४) * ८५६ श्री.प्रविण दरेकर, श्री.जयंत पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिरवाडी शहर (ता.महाड, जि.रायगड) येथील म्हाप्रळ-पंढरपूर-खरवली पुलाची दुरवस्था झाली असून तो कोणत्याही क्षणी कोसळून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाल्याने या ठिकाणी नविन पूल बांधण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी नाबार्डमधून मंजूर करण्यात आला आहे. मात्र ४ वेळेस निविदा काढूनही एकाही ठेकेदाराने निविदा न भरल्याने संबंधित पुलाचे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची स्थिती अत्यंत धोकादायक असल्यामुळे दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केल्यानंतर सदर पुलाचे काम विनाविलंब पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात यावी अशा मागणीचे एक निवेदन राज्याचे मुख्य अभियंता, श्री.सी.पी. जोशी यांना सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनानुषंगाने म्हाप्रळ-पंढरपूर-खरवली पुलाची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) हे खरे नाही.

सदर कामाच्या ३ वेळेस निविदा प्रसिध्द झाल्यानंतर ५४% जास्त दराने निविदा प्राप्त झाली आहे. सदर जास्त दराची निविदा प्रशासकीय मान्यतेच्या रकमेत बसत नसल्याने सदरची निविदा नामंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे सदर पुलाचे काम प्रलंबित आहे.

(२) निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) प्रश्नांकित पुल काही ठिकाणी नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर पुलाची दुरुस्ती करण्यात येत आहे. तसेच प्रश्नांकित पुलाच्या बाजूला नवीन दुपदरी पुल बांधण्याचे काम नाबार्ड अंतर्गत मंजूर आहे. निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न प्रलंबित असल्याबाबत

(७५) * १५९४ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ३७८२० ला दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्न गत सुमारे ६३ वर्षापासून प्रलंबित असून सदर प्रश्नावर चर्चा करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान सर्व संबंधितांची बैठक आयोजित करुन काही निर्णय घेतले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले असून कोणकोणत्या मान्यवरांना आमंत्रित करण्यात आले होते तसेच सदर प्रश्नाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकेची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली याचिका निकाली काढण्याबाबत व सदर याचिकेसाठी नामांकित विधीज्ञांची नेमणूक करण्याबाबत तसेच उक्त प्रश्न कालबध्दरितीने सोडविण्याबाबत शासनाकडून आजतगायत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे : (१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाबाबत दिनांक ७ डिसेंबर, २०१९ रोजी मुख्यमंत्री समिती कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे आढावा बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस सर्व मा.मंत्री, मा.मुख्य सचिव, मा.महाअधिवक्ता महाराष्ट्र राज्य, सचिव (विधी), ॲडव्होकेट ऑन रेकॉर्ड श्री.शिवाजी जाधव, तज्ञ साक्षीदार श्री.दिनेश ओऊळकर, मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समिती, बेळगाव तसेच महाराष्ट्र एकीकरण समिती, बेळगाव यांचे पदाधिकारी यांना आमंत्रित करण्यात आले होते. सदर बैठकीत सीमा प्रश्नासाठी समन्वयक मंत्री म्हणून श्री.छगन भुजबळ, मा.मंत्री व श्री.एकनाथ शिंदे, मा.मंत्री यांची नियुक्ती करण्याचे निर्देश दिले. प्रस्तुत याचिकेसंदर्भात केंद्र शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात सुनावणीच्या वेळी तटस्थतेची भूमिका घ्यावी अशी केंद्र शासनास विनंती करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदय यांनी राज्यातील सर्वपक्षीय खासदारांसह मा.पंतप्रधान यांची भेट घेण्याचा व वकील महोदयांसोबत तसेच या प्रश्नाबाबत सुनावणीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे, असे निर्णय घेण्यात आले.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १३/१२/२०१२ रोजीच्या आदेशाने निश्चित केलेल्या २१ वादाच्या मुद्यांतील मुद्दा क्र. १ बाबत कर्नाटक शासनाने दाखल केलेल्या इंटरलोकुटरी अर्ज क्र. I.A.१२/२०१४ वरील दिनांक २३/०१/२०१७ रोजी झालेल्या सुनावणीअंती दोन्ही पक्षकारांनी आपले म्हणणे मांडावे, असे आदेश दिले. यासंदर्भातील पुढील सुनावणी दिनांक १० मार्च, २०१७ रोजी ठेवण्यात यावी, असे मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले होते. या आदेशास अनुसरुन दिनांक १०/०३/२०१७ रोजी व दिनांक ३१/०७/२०१७ रोजी ठेवण्यात आलेली सुनावणी वगळण्यात येवून ती दिनांक १०/१०/२०१७ रोजी ठेवण्यात आली होती. तथापि, काही तांत्रिक कारणांमुळे सुनावणीची तारीख पुढे ढकलण्यात आली. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सदर आदेशास अनुसरुन महाराष्ट्र शासनाने आपले म्हणणे मा.सर्वोच्च न्यायालयात दिनांक ०९/१०/२०१७ रोजी दाखल केले आहे. तद्नंतर सदर याचिकेची दिनांक ०८/०१/२०१९ व दिनांक २९/०१/२०१९ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयात ठेवण्यात आलेली सुनावणी त्रिसदस्यीय खंडपीठामध्ये अनुक्रमे श्री.एस.अब्दुल नझीर व श्री.मोहन एम.शांतानागौडर हे न्यायमुर्ती कर्नाटक राज्यातील असल्याने होऊ शकली नाही. सदर प्रकरण हे दिनांक ०९/०७/२०१९ व दिनांक २६/११/२०१९ रोजी सुनावणीसाठी दर्शविण्यात आले होते, तथापि, तांत्रिक कारणामुळे सुनावणीच्या यादीतून वगळण्यात आले. पुढील सुनावणीची तारीख अद्याप निश्चित झालेली नाही.

(३) सदर न्यायालयीन दाव्यात राज्याची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी वरिष्ठ विधिज्ञ श्री.हरीष साळवे, श्री.के.परासरन, श्री.राकेश द्विवेदी, श्री.राजू रामचंद्रन व श्री.अरविंद दातार यांची विशेष समुपदेशी म्हणून नियुक्ती केली आहे. मा.कोर्ट कमिशनर यांच्यासमोर साक्षीपुरावे सादर करण्यासाठी तज्ञ साक्षिदारांची शपथपत्रे तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २३/०१/२०१७ रोजी दिलेले आदेश रद्द करून दिनांक १२/०९/२०१४ रोजी दिलेले आदेश न्यायिक असल्याने ते कायम ठेवण्यात यावेत, त्यानुसार साक्षी व पुरावे तपासण्यात यावेत, याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात दिनांक २२/०५/२०१९ रोजी अर्ज दाखल केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कुलाबा (मुंबई) येथील हॉटेल ताज पॅलेसने मुंबई महानगरपालिकेचे शुल्क थकविल्याबाबत

(७६) * ९७४ श्री.रामदास कदम : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा (मुंबई) येथील पंचतारांकित हॉटेल ताज पॅलेसने मुंबई महानगरपालिकेचा रस्ता काबीज केल्याकारणास्तव चार कोटी रुपये शुल्क वसुल करणे अपेक्षित असताना महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी परस्पर फेरफार करुन स्थायी समितीच्या मान्यतेविनाच सदर शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वसामान्य माणसाने मालमत्ता कर, पाण्याचे बिल थकविले असता महानगरपालिका तात्काळ कारवाई करते परंतु, ताज पॅलेसने महापालिकेच्या काबिज केलेल्या रस्त्यांवर अतिक्रमण केले असूनही नियमाप्रमाणे रस्त्याचे शुल्क व्याजासहित वसूल करण्याबाबत निर्णय झालेला असताना देखील शुल्कमाफीत बदल करुन शासनाचा महसूल बुडविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१), (२), (३) व (४) सन २००८ मध्ये हॉटेल ताज पॅलेसवरील दहशतवादी हल्ल्यात झालेली जिवित हानी व हॉटेलचे नुकसान पाहता, भविष्यात अशा प्रकारचा हल्ला होऊ नये यासाठी मुंबई पोलिसांच्या निर्देशाप्रमाणे हॉटेल ताज पॅलेसच्या सभोवतालच्या रस्त्यावर इमारतीच्या बाजूने मोठ्या कुंड्या/बॅरिकेट्स ठेवण्यात आल्या होत्या व सन २००९ पासून बाजूचे पदपथ नागरिकांकरीता बंद ठेवण्यात आले होते.

त्यानुसार हॉटेल ताज पॅलेसला जून, २००९ ते डिसेंबर, २०१८ या कालावधीत कुंड्या ठेऊन रस्ता वापराबाबतचे शुल्क रुपये १.२५ कोटी व पदपथ बंद करण्याबाबतचे शुल्क रुपये ७.८६ कोटी असे एकूण रुपये ९.११ कोटी शुल्काची आकारणी महानगरपालिकेमार्फत करण्यात आली होती.

सदर एकूण शुल्काच्या ५०% म्हणजेच रुपये ४.६२ कोटी इतकी रक्कम हॉटेल ताज पॅलेसकडून वसुल करण्यास स्थायी समितीच्या मान्यतेसापेक्ष व स्थायी समितीने मान्यता न दिल्यास सदर रक्कम ३० दिवसांच्या आत ६% व्याजासहित भरण्याची तयारी दर्शविणारे हमीपत्र सादर करणे सापेक्ष आयुक्तांनी दिनांक ३०/०४/२०१९ रोजी मंजुरी दिली.

त्यादरम्यान हॉटेल ताज पॅलेसने केलेल्या उपाययोजना या पुढील कालावधीतही चालू ठेवण्याचे आवश्यक असल्याचे पोलीस प्रशासनाने कळविले.

तथापि, पदपथ सुरक्षिततेच्या कारणास्तव बंद करण्यात आल्यामुळे पदपथ आकारणीपोटीचे शुल्क रुपये ७.८६ कोटी इतकी रक्कम माफ करावी अशी विनंती ताज हॉटेल प्रशासनामार्फत दिनांक २४/०५/२०१९ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली.

सदर विनंतीच्या अनुषंगाने, कुंड्याव्याप्त रस्त्याच्या रुपये १.२५ कोटी इतक्या शुल्काच्या ५०% म्हणजेच रुपये ६२.८८ लाख इतकी रक्कम भरुन घेणे व पदपथ आकारणी शुल्क पूर्णपणे माफ करण्याच्या सुधारीत प्रस्तावास स्थायी समितीच्या मंजूरीसापेक्ष व स्थायी समितीने मंजूरी न दिल्यास उर्वरित रक्कम ३० दिवसांच्या आत १२% व्याजाने महानगरपालिकेकडे जमा करण्याचे हमीपत्र सादर करण्यासापेक्ष आयुक्तांनी दिनांक १८/०६/२०१९ रोजी मंजुरी दिली आहे.

सदर प्रस्तावाची छाननी करण्यात आली असून, पडताळणी दरम्यान आढळलेल्या त्रुटी दूर करुन सदर प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच, सदर प्रस्तावास आयुक्तांनी दिलेल्या मंजुरीनुसार, ताज हॉटेल पॅलेस व्यवस्थापनाने रुपये ६२.८८ लाख इतक्या रकमेपैकी सन २०१७ मध्ये आगाऊ भरणा केलेले रुपये १० लाख वगळता, रुपये ५२.८८ लाख इतक्या रकमेचा भरणा दिनांक १७/०७/२०१९ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे केला आहे.

बाळापूर व मुर्तिजापूर (जि.अकोला) शहरांमध्ये बांधलेली घरकुले लाभार्थ्यांना देण्याबाबत

(७७) * ९३६ श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळापूर व मुर्तिजापूर (जि.अकोला) शहरांमध्ये शासनाची महत्वाकांक्षी योजना आयएचएसडीपीमार्फत सामान्य लोकांकरीता घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले असतानाही घरकुले लाभार्थ्यांना देण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाळापूर शहरामध्ये पीएमसी व कंत्राटदार यांनी संगनमताने लाभार्थ्यांच्या खोटया याद्या तयार करुन लाभार्थ्यांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेमध्ये फक्त पीएमसी व कंत्राटदार लाभार्थी ठरले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनस्तरावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जितेंद्र आव्हाड : (१) आयएचएसडीपी योजनेंतर्गत नगर परिषद बाळापूर, अकोला यांनी बांधलेल्या १६५२ घरकुलांचे व मुर्तिजापूर नगर परिषद, अकोला यांनी बांधलेल्या १६२३ घरकुलांचे वाटप जून, २०१८ अखेरपर्यंत करण्यात आले आहे. तथापि, नगरपरिषद बाळापूर यांनी बांधलेल्या घरकुलांमध्ये सुरुवातीला विद्युत व पाणीपुरवठा सुविधा नसल्याने केवळ १५० लाभार्थ्यांनी वास्तव्य केले आहे.

(२) व (३) आयएचएसडीपी योजनेंतर्गत नगर परिषद बाळापूर, अकोला येथील १६५२ लाभार्थ्यांपैकी ४२६ लाभार्थी वगळता प्राथमिक यादीतील उर्वरित लाभार्थ्यांनी इच्छुकता न दर्शविल्याने नगरपरिषदने दिनांक २०/०२/२०१६, २६/०३/२०१६ व २३/०७/२०१६ रोजी उर्वरीत घरकुलांसाठी स्थानिक

वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविले. त्यानुसार प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने नगरपरिषदेने पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा गृहनिर्माण समितीच्या मान्यतेने, उर्वरीत १२२६ लाभार्थ्यांची निवड करुन त्यांना घरकुलांचे वाटप केले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

अजिंठा लेणी (जि.औरंगाबाद) येथील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे पर्यटकांच्या संख्येत घट झाल्याबाबत

(७८) * १६१९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अजिंठा व वेरुळ येथील लेण्या स्थापत्यकला, शिल्पकला तसेच चित्रकलेसाठी जगप्रसिध्द असून औरंगाबादपासून अजिंठा-वेरुळ लेणीपर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे काम प्रलंबित असल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याने देशी व परदेशी पर्यटकांची संख्या कमी झाल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याचे काम करण्यासाठी टुरिझम प्रमोटर्स गिल्ड यांनी पर्यटन, मंत्रालय व यात्रा व्यवसाय विभागाकडे पत्राव्दारे पाठपुरावा केल्यानंतरही कामाला गती मिळाली नसल्याने पर्यटकांसाठी सुरु असलेल्या विविध व्यवसायातही तोटा निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त प्रश्नांबाबत आढावा घेऊन अजिंठा-वेरुळ लेणीपर्यंत जाणाऱ्या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच रस्त्याच्या कामासाठी शासनामार्फत किती निधी देण्यात आला आहे, त्याबाबतची सद्‌य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण : (१) ते (३) अंशत: खरे आहे.

अ) औरंगाबादपासून अजिंठापर्यंत जाणारा रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३ F चा भाग आहे. सदर रा.म.क्र.७५३ F च्या १४७.११० कि.मी. लांबीमध्ये रस्त्याची पुनर्बांधणी व दर्जोन्नती करुन दुपदरीकरण करण्याकरीता दिनांक १२/०६/२०१७ रोजी M/s. Lanco Infrastructure Ltd & Ritwik Project Pvt. Ltd (JV) यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. तथापि, सदर रस्त्याच्या मंजूर दुपदरीकरणाच्या कामाऐवजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जुलै २०१७ दरम्यान चौपदरीकरणासाठी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कामाच्या मंजूर वावात झालेल्या बदलास सक्षम प्राधिकरणाकडून मंजुरी प्राप्त करुन घेणे तसेच दरम्यानच्या कालावधीत मूळ कंत्राटदार दिवाळखोरीत निघाल्यामुळे निविदा तरतुदीनुसार पर्यायी कंत्राटदारांची नियुक्ती करणे वगैरे उपाययोजना करुन सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर आहे.

जळगाव ते औरंगाबाद चौपदरीकरणाचे १४७.११ कि.मी.चे काम सद्य:स्थितीत प्रतिदिन सुमारे १.५० कि.मी. नुसार पूर्ण करण्यात येत असून कामाची प्रगती समाधानकारक आहे, असे क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी कळविले आहे. त्यानुसार एप्रिल, २०२० अखेर रस्ता वाहतुकीसाठी सुरळीत ठेवण्याच्यादृष्टीने सदर रस्त्याची एक बाजू पूर्ण करण्याचे प्रयोजन आहे. सदर कामाकरीता केंद्र शासनाकडून आवश्यक निधी उपलब्ध आहे.

ब) औरंगाबाद-वेरुळ हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ (जुना एनएच-२११) चा भाग असून सदर रस्ता केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे. सन २०१७-२०१८ मध्ये Periodical Renewal अंतर्गत हा रस्ता वाहतूकीस सुस्थितीत करण्यात आला आहे. तसेच औरंगाबाद ते वेरुळ नवीन रस्त्याच्या बाहयवळण रस्त्याचे काम प्रगतीपथावर असून फेब्रुवारी २०२१ पर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचे नियोजन आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी शहरातील रस्त्यांवरील एलईडी पथदिवे बंद असल्याबाबत

(७९) * १६७३ श्री.विप्लव बाजोरिया : तारांकित प्रश्न क्रमांक ४७२९९ ला दिनांक १९ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील रस्त्यांवरील एलईडी दिव्यांच्या दुरुस्तीकडे महानगरपालिका दुर्लक्ष करीत असल्यामुळे एलईडीचे पथदिवे बंद पडल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका पथदिव्याच्या देखभाल दुरुस्तीच्या नावावर लाखो रुपये खर्च करीत असतानाही एलईडी पथदिवे बंद असल्याचे कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींविरुध्द कारवाई करुन सदर पथदिवे दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) सदर कालावधीत शहरातील पथदिवे बंद होते. अशी वस्तुस्थिती नाही, असे परभणी शहर महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(२) व (३) शासनाच्या धोरणानुसार EESL या केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रम असलेल्या कंपनीमार्फत परभणी शहरात एलईडी पथदिवे बसविण्यात आलेले आहेत.

सदर पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती EESL या कंपनीमार्फत करण्यात येत असल्यामुळे सदर पथदिव्यांच्या दुरुस्तीकरीता परभणी महानगरपालिकेकडून खर्च करण्यात येत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वसई-विरार महानगरपालिकाक्षेत्रात बेकायदा मांस विक्री सुरु असल्याबाबत

(८०) * २१५२ श्री.आनंद ठाकूर : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकाक्षेत्रात हजारो मांस विक्रेते बेकायदेशीररित्या (बोकड/कोंबडी यांचे) मांस विक्री करण्याचा व्यवसाय करित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मांस विक्रेते शासनाने आखून दिलेल्या गुणवत्तेबाबत व स्वच्छतेबाबतचे शासकीय निकष दुर्लक्षित करुन अटी व शर्तींचे सर्रासपणे उल्लंघन करीत असल्याने उक्त अनधिकृत मांस विक्रेत्यांवर कारवाई करण्याची मागणी वसई तालुक्यातील एका राजकीय पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी दिनांक ०६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास सविस्तर लेखी निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व निवेदनाच्या अनुषंगाने कोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छता अभियानांतर्गत कचरा विलगीकरणाची प्रक्रिया सुटसूटीत करणे अंतर्गत महानगरपालिकेने शहर क्षेत्रात बोकड/कोंबडी मांस विक्री करणाऱ्या केंद्रांचे सर्वेक्षण माहे डिसेंबर, २०१९ पासून सुरु केले आहे. सदर सर्वेक्षणात अंदाजित ६१५ अनधिकृत विक्रेते निदर्शनास आले आहेत.

सदर अनधिकृत विक्रेत्यांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८२, ३८६ अन्वये कारवाई सुरु केली आहे. सदर अनधिकृत विक्रेत्यांवर महानगरपालिकेने दंड ठोठावणे, उघड्यावरील मांसाची विल्हेवाट लावणे याबाबत नोटीसा दिल्या असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) अनधिकृत मांस विक्रेत्यांवर कारवाई करण्याची तक्रार शासनाकडे प्राप्त झाली आहे. महानगरपालिका क्षेत्रात मांस विक्री करताना शासनाने मांस विक्रीच्या अनुषंगाने विहित केलेले गुणवत्तेचे व स्वच्छतेचे सर्व निकष पालन करण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यास महानगरपालिकेस सूचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **श्री.राजेंद्र भागवत**

मुंबई. **सचिव (कार्यभार),**

महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.